परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज

अंक १३८ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०२४

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

मागचा मार्च महिन्याचा 'हितगुज' संमेलन विशेषांक काढला. कणकवली येथे १२वे अखिल भारतीय मराठे परिवार संमेलन मोठ्या उत्साहाने, हौशीने कसे संपन्न झाले; संमेलनाचा आनंद उपस्थितांनी कसा घेतला हे सर्वांनी त्याविषयी भरभरून लिहिलेल्या लेखांमुळे आपणांस समजले. जे संमेलनाला उपस्थित राहू शकले नाहीत अशा कुलबांधवांना संमेलनांतील वर्णने वाचून प्रत्यक्ष उपस्थित राहिल्याचा आनंद झाला असेल.

मंडळी, आपण सर्व वाढत्या उन्हाळ्यामुळे हैराण झालो आहोत. वाढता उन्हाळा, लांबणारा हिवाळा आणि हुलकावण्या देणारा पावसाळा यारूपाने पर्यावरणाची हानी समस्तांना अनुभवास येत आहे. उष्णतेच्या तीव्र लाटा, वाढते तापमान हा चिंता करायला लावणारा विषय आहे. पाणीबाणीचे संकट पाहून तोंडचे पाणी पळाले आहे. अशा उष्ण वातावरणात निवडणुकांचे प्रचार, भाषणे यांना राजकीय वर्तुळात जोर आल्याने वातावरण आणखीनच तापले आहे. मतदानाचा पवित्र हक्क आपण बजावला. अंक हातात येण्यापूर्वी निकालही जाहीर झाले असतील. भव्य शोभायात्रा, विजयोत्सवाचे वारे वाहू लागतील, पण सामान्य माणूस, बळीराजा, पावसाची आतुरतेने वाट पाहात आहे. मृगाचा पाऊस तृषार्त धरणीला कधी शांत करतो याची प्रतीक्षा आहे. यंदा पाऊस चांगला होईल असा हवामान खात्याचा अंदाज आहे तो खरा ठरो आणि वरूणराजाची कृपादृष्टी आपल्यावर पडो हीच कुलदेवतेकडे प्रार्थना आहे. असो.

मंडळी आपल्याला वाईट वाटेल अशी बातमी म्हणजे आपल्या कुलभगिनी श्रीमती निर्मला जनार्दन मराठे, भोपाळ यांना मंगळवार, दि. १४ मे (गंगासप्तमी) सकाळी ११ वा. देवाज्ञा झाली. गोड गळ्याच्या, प्रसन्न, मनमिळाऊ, प्रेमळ अशा निर्मलाताईंना कोण विसरेल बरे? आपल्या मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनांना, कार्यक्रमांना त्यांची आवर्जून उपस्थिती असे. गोवा संमेलनात तर त्यांची माझ्याशी जास्त जवळीक झाली. माहेरच्या घारपुरे-बडोदा, त्यांचा भाऊ अधिवक्ता श्रीरंग घारपुरे (सावरकर स्मारकात कार्यकारिणी सदस्य) अशी ओळख निघाली. बडोदा संमेलनातही त्या भेटल्या. सांगली संमेलनात तर त्यांच्या तीन पिढ्या एकत्र आल्या होत्या. कणकवलीला संमेलनाला त्यांना यायचे होते पण प्रकृती ठीक नसल्यामुळे त्या येऊ शकल्या नाहीत. दादरला, पंच्याहत्तरीतल्या कुलबांधवांचा सत्कार केला त्या कार्यक्रमात त्यांचाही प्रतिष्ठानने यथोचित सत्कार केला. त्यासमयी त्यांनी श्रीरामाचा गोड अभंग गायला होता. हितगुज वाचल्यावर मला न चुकता दूरध्वनी करीत हितगुज चांगला निघतो, वाचनीय आहे, तुमच्या कथा मला आवडतात असे सांगत असत. भोपाळला आमच्या घरी या म्हणून आग्रह करीत. मध्यंतरी मी नणंदेच्या मुलाच्या लग्नाला इंदुरला गेले होते. हे त्यांना सांगितल्यावर त्या लगेच म्हणाल्या, "मला का कळवले नाही?" त्यावर मला लगेच कार्य पार पाडल्याबरोबर मुंबईला घरी परतायची घाई होती म्हणून कळवले नाही, असे सांगितल्यावर त्या म्हणाल्या, "त्यात काय मी विमानाने लग्नाच्या हॉलवर आले

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ८४३३६७४८२७ • इ-मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

असते ना तुम्हाला भेटायला'', भेटीची ओढ त्यांना अशी होती. त्यांच्या जाण्याने ती आत्मीयता, मायेने बोलणे सगळेच संपले. मराठे परिवारातल्या कुलभगिनीचे असे निर्व्याज प्रेम मला मिळाले म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजते. त्यांच्या प्रोत्साहनामुळे काम करायला उत्साह वाटायचा. निर्मलाताईंना मोडी लिपीचे उत्तम ज्ञान होते. पति निधनानंतर खचून न जाता, खंबीरपणे उभ्या राहिल्या, नोकरी करून मुलांना शिकविले, मार्गी लावले. संसाराची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडली. निर्मलाताईंचा आपल्याला म्हणून विशेष अभिमान वाटतो.

व्यक्तिगत आणि मराठे प्रतिष्ठानतर्फे निर्मलाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली वाहते.

या अंकात गुणवत्ता पारितोषिके मराठे प्रतिष्ठानतर्फे दिली जातात त्याची सविस्तर माहिती दिली आहे. तरी यशस्वी विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत व बक्षिसे घेऊन जावीत. सर्व गुणवंत, उत्तीर्ण, यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करते. असो.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २८ मे, २०२४, सावरकर जयंती)

भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

# डंख मारणारे कीटक

**डों**गरदऱ्यांमध्ये पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केल्याच्या बातम्या आपण वाचतो. या मधमाशांचा डंख अत्यंत विखारी असल्याने माणसाला त्याचा दाह सहन होत नाही. अनेक माशांनी डंख केला असेल, तर माणूस बेशुद्धही पडतो. मात्र, कीटकांच्या विश्वात मधमाशांसारखे डंख मारणारे मुंग्या आणि गांधीलमाशांसारखे इतरही काही कीटक आहेत.



हे कीटक समाजप्रिय असतात, म्हणजेच ते अत्यंत संघटित वसाहतींमध्ये राहून पिलांना वाढवतात. यांच्यामधील राणी अंडी घालते आणि बाकी सर्व जण वसाहतीमधील कामांमध्ये मदत करतात. हे कीटक अत्यंत सुंदर घरे बांधतात, एकमेकांशी वेगवेगळ्या पद्धतींनी संवाद साधतात आणि स्वसंरक्षणासाठी डंखाचा (स्टिंग) वापर करतात. ते निसर्गातील परागीभवन, कीडनियंत्रण, कुजलेल्या कचऱ्याचे विघटन आणि अन्नसाखळीत मोलाची भूमिका बजावतात. मधमाशा आणि गांधीलमाशांच्या काही जाती एकट्या राहतात.

मातीच्या मडक्यासारखे सुंदर घर बांधणारी कुंभारमाशी छोटे किडे पकडून, तिच्या घरात पिलांसाठी खाणे म्हणून ठेवते. परागीभवन करणारी सुतारमाशी लाकडात घर करून पिलांना परागकण आणि मधापासून बनवलेला 'पोलन ब्रेड' खायला देते. अंजिराच्या झाडाच्या पुनरुत्पादनामध्ये लहानशा अंजीर माशीचा मोठा वाटा असतो. ती अंजिराच्या फुलांमध्ये अंडी घालते आणि तसेच त्याचे परागीभवनही करते. लीफकटर माशी पानांचे गोलाकार तुकडे कापून, ते गुंडाळून एखाद्या सिगारेटसारखे घर बांधते. त्याच्या आतील कप्प्यांमध्ये पिल्लांसाठी अन्न म्हणून पोलन ब्रेड साठवते आणि अंडी घालून, दरवाजा बंद करून निघून जाते.

या कीटकांचे जग कितीही मनोरंजक आणि सुंदर असले, तरी आपल्याला त्यांच्या डंखाची भीती वाटते. या डंखावर किंवा स्टिंगवर जस्टिन श्मिडट या कीटक शास्त्रज्ञाने खूप संशोधन केले. प्रयोग करताना त्यांना सुमारे १५० वेगवेगळ्या प्रजातींच्या कीटकांनी दीड हजारवेळा डंख मारला. त्यांच्या अभ्यासामुळे त्यांना 'किंग ऑफ स्टिंग' म्हणून ओळखले जाते. विषारी कीटकांबद्दल संशोधन आणि जनजागृती यासाठी त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

**– डॉ. राहुल मराठे**

## सुविचार

स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे।
नामस्मरणे पावावे। समाधान।।
जे जे आपणास पाहिजे। ते ते कल्पून वाहिजे।
येणे प्रकारे कीजे। मानसपूजा।।

**– श्री समर्थ रामदासस्वामी**

# आंब्याची कहाणी

• विजय मराठे, कार्याध्यक्ष मराठे प्रतिष्ठान भ्रमणध्वनी : ९४२३०११९४९

सुमारे ९० वर्षापूर्वी अक्षयच्या आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या झाडांचे आज व्यवसायात रुपांतर झाले. माझी भाची ॲड. अयुधा अक्षय देसाई संगणकीय गुन्हेगारीचा अभ्यास असलेली सध्या रत्नागिरी कोर्टात सरकारी वकील म्हणून कार्यरत आहे. अक्षयचे वडील डॉ. सदानंद देसाई अतिशय शांत स्वभाव, उत्तम आरोग्य परीक्षा म्हणून गेले कित्येक वर्ष पावसमध्ये वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देत आले. पण अकस्मात २३ जानेवारी २०२४ ला तीव्र हृदयविकाराने दुखःद निधन झाले. अक्षय, अयुधा वयाने लहान खुपच लहान आहेत तरी गेले २ ते ३ वर्षे आंब्याचा व्यवसाय पहातच आहेत.

आंब्याच्या बागा फार पूर्वीपासून आहेत सरिता काकू व गोखले काका यांनी पुढाकार घेऊन आंबा बाहेर गावी पाठवायचा व्यवसाय मनापासून सुरू केला. त्याला डॉक्टरांचे मनापासून सहकार्य मिळत गेले. आता वटवृक्ष होत आहे हे चांगलेच आहे.

आंबा हे अतिशय नाजूक, नाशवंत फळ आहे. त्याकरता भरपूर मनुष्यबळ लागते स्वतःला झोकून देऊन काम करावे लागते. अयुधा मला जानेवारीत म्हणाली की, ''सद्यपरिस्थितीत अक्षयला डॉक्टर व गोखले काका तसेच राजा मामांची या कामात खुपच मदत होत होती पण यापैकी आता गोखले काकाच (नाबाद ७३) अतिशय उत्साही उपलब्ध आहेत तू मदतीला येशील का?'' असे विचारल्यावर मी पटकन मनापासून तयार झालो आणि ३ मे ला पावसला रात्रीचा प्रवास करून पोचलो.



दिनक्रम जाणून घेतला रोज सकाळी ९ वाजेपर्यंत ओमनीमध्ये रिकामे क्रेट भरून अक्षय बागेत जातो. तेथे ८ मदतनीस की जे अक्षयला भावासारखे आहेत, गेले २० वर्ष काम करत आहेत खूपच माहिती आहे. आंबे काढायला एक लांब काठी त्याला गोल लोखंडी रिंग त्याला जाळी व धारदार पाते असते आंबे काढायची सामुग्री. झाडे खुपच जुनी व मोठी तसेच उंच वाढलेली आहेत त्यावर चढून आपला तोल सांभाळत फळाचे नुकसान न होता आंब्याची काढणी दुपार १ वाजेपर्यंत केली जाते. ते क्रेटमध्ये भरून एकत्रित केले जातात. गाडीत साधारण १८ क्रेट एकावेळेस भरून घरी आणून ठेवायचे साधारणपणे रोजचे २५ ते ३० क्रेट होतात.

जेवणानंतर त्या क्रेटमधील आंब्याची वर्गवारी तसेच फळ स्वच्छ करून केली जाते. यात साधारणपणे ६ आकाराची फळे वेगळी केली जातात. दशमान पद्धत असली तरी आंबा अजून डझनावर विकला जातो हे विशेष. एकदम छोट्या आकाराच्या फळास बिटक्या म्हणून ओळखतात. साधारण ३, ४, ५, ६ डझनाच्या लाकडी पेट्या घरीच तयार कराव्या लागतात. बरेच जण आंब्याच्या झाडाचे लाकूड मशिनवर योग्य तऱ्हेने कापून आणतात.

तसेच २ व १ डझनचे बॉक्स भरले जातात. हे सर्व उपलब्ध करावेच लागते. आंब्यात नुकसान फार होते, याला फळ माशी नावाचा किटक आहे तो फळा मध्ये अंडी घालतो. हळूहळू ती अंडी वाढत जातात वरून फळाला सुई टोचल्यावर जसे दिसते तसे काळे बारीक डाग दिसतात त्यावर उपाय म्हणून जागोजागी पाण्याच्या बाटल्या अर्धवट कापून लावल्या की त्यात त्या माश्या जमा होतात व पाण्यात पडून मरतात. काही फळांवर चिकाचे काळे डाग असतात, ते साध्या पाण्याने कापडी फडक्याने पुसले तरी जातात. नाहीच निघाले की ते फळ कॅनिंग फॅक्टरीला किलोच्या भावात दररोज सायंकाळपर्यंत पाठवावेच लागतात. यात काही फळे झाडावरच पिकायला लागतात.

प्रतवारी करून झाल्यावर ज्या ऑर्डर आल्या आहेत त्या नुसार पेट्या व बॉक्स भरले जातात. त्यात तळात गवत मग एक डझन कच्चे फळ परत कागद-गवत, थोडा रंग बदललेले फळ परत एक थर, थोडे पिकायला आलेले फळ, वरती गवत त्यावर लाकडी

फळ्या मारून पेटी बंद करणे, त्याला स्ट्रपिंगची पट्टी लावणे, संबंधित घेणाऱ्यांचे नाव गाव, किती डझन आहेत, कधी पेटी भरली, पाठवणाऱ्याचे नाव, कोणत्या गावाला कोणता वाहतूकदार उपलब्ध आहे ते बघून त्याचे नियोजन फारच महत्त्वाचे आहे. पेटी वा बॉक्स घरपोच लागतो ग्राहकास तसदी नको हा हेतू. कोणास पाठवायचे त्याचे नाव, पत्ता, फोन नंबर लिहून पाकिटात चलन घालून त्या पेटी वा बॉक्स वर लावून ठेवणे. संबंधित वाहतूकदार येऊन घेऊन जाताना त्याचा पाठपुरावा करावा लागतो ते मध्यरात्री पर्यंत कधीही येतात. घरपोच करताना दुसऱ्या दिवशी पुणे मुंबई येथे रात्रीपर्यंत पोचवण्यात येतात मग संबंधित ग्राहकांचा संपर्क होतच रहातो.

आंबे पोच झाल्यावर त्याचे पैसे ऑनलाईन कोणत्या खात्यात जमा करायचे त्या संबंधात माहिती उपलब्ध करून देणे, आलेले पैसे कोणाकडून आले याच्या नोंदी करून घेणे, काहीच्या तक्रारी येतात त्याची उत्तरे देणे, असा दररोज नित्य दिनक्रम. यात रात्रीचे १२ कसे वाजतात हे कळतच नाही. असा दिनक्रम साधारण १५ एप्रिल ते ३० मे पर्यंत चालू असतो.

सरिता काकूचे वरील सर्व कामावर बारीक लक्ष असते दररोज आंब्याचा रस काढणे, त्यात योग्य प्रमाणात साखर मिसळून आंब्याचे साटे (आंबा पोळी) तसेच बरक्या फणसाचे (फणस पोळी) बनवणे. त्या करता ४ महिला तो रस ट्रे मध्ये योग्य प्रमाणात वाळवण्या करता पसरवतात. साधारणपणे दोन दिवसांत ते ट्रे कडक उन्हात वाळतात. मग ते काढले जातात. त्याचे योग्य प्रमाणात तुकडे करून उन्हात वाळवून मग पॅकिंग केले जाते.

कोकम फळापासून कोकम सरबत करताना कोकम फळाचे बारीक तुकडे चिरून त्यात योग्य प्रमाणात साखर मिसळून ते उन्हात ठेवणे, आठ दिवसात कोकम सरबत तयार होते ते एक लिटरच्या कॅन मध्ये भरून ठेवणे. आमसूल करणे-कोकम फळ कडक उन्हात मीठ लावून पूर्ण वाळले की आमसुले तयार होतात त्याची पॅकेट तयार करणे. वाळवून तयार केलेली मिरची खुपच छान लागते जाड मिरच्या घ्यायच्या त्यामध्ये कापून त्यात मसाल्याचे मिश्रण भरून कडक उन्हात आठ दिवस वाळवून झाल्यावर त्याचे पॅकिंग करणे. मिरची व कैरीचे लोणचे मोठ्या प्रमाणात विक्री करतात. आंब्याचा साखरांबा करणे, कैरीचा छुंदा करणे. अर्धवट पिकलेला फणस कापून त्यातील गरे सोलुन आठळ्या काढल्या नंतर लांब कापायचे. घरीच नारळ भरपूर असल्यामुळेच खोबरेल तेल छोट्या मशीनमधून काढून त्यात हे गरे चुलीवर छान तळले जातात. तळताना योग्य प्रमाणात मिठाचे पाणी शिंपडणे म्हणजे खमंग तळलेल्या गरे खाताना चविष्ट लागतात हे फारच चोरटे खाणे आहे. घरीच खोबरेल तेल काढल्याने ते गरे ६ महिन्या पेक्षा जास्त हवाबंद डब्यात छान रहातात.

असे काही ना काही पदार्थ चालूच असतात ते योग्य पद्धतीने होत आहेत, यावर सरिता काकूंचे सतत लक्ष असते.

आता स्पर्धात्मक युगात हा व्यवसाय कसा करावा हे मोठे आव्हान आहे. सर्व आंबा व्यावसायिकांचा वार्षिक उदर निर्वाह या वरच अवलंबून असतो म्हणून आंब्याच्या जोडीला फणस, कोकम, कुळीथ पीठ, अशी उत्पादने करावीच लागणार.

'कोरोना'च्या प्रादुर्भावाने शेतकरी आपली उत्पादने ग्राहकास विक्री करू लागले. त्या काळात मोठ्या गृहनिर्माण संस्थेत मोठ्या प्रमाणावर आंब्याचे बॉक्स घरपोच मागवले गेले आता तेच ग्राहक. चांगल्या प्रतीचा गवतात पिकवलेला आंबा पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर अशा अनेक मोठ्या शहरात भरपूर जातो.

ग्राहक समाधानी तरच आंबा उत्पादक खुश. कोकणातील आंब्यात कर्नाटकातील आंबा मोठ्या प्रमाणात मिसळण्यात येतो त्यामुळेच रत्नागिरी व देवगड आंब्याचे दर वाढतात. हे सर्व प्रत्यक्ष बघण्याचा योग आला आपणांस शहरात तयार पदार्थ मिळतात पण ते योग्य रीतीने तयार करण्यास किती मेहनत घ्यावी लागते हे कळले.

आंबे साधारणपणे मार्च महिन्यात यायला लागतात पण त्या सर्व झाडांच्या वाढीकरता खते घालणे, झाडांवर काही कीड लागणार नाही या करता औषधांची फवारणी करावी लागते. डिसेंबरपासून मोहर फुलायला लागतो त्यावर फवारणी करावी लागते. त्यानंतर कैरीचे दर्शन होते. साधारण जानेवारी फेब्रुवारीपर्यंत मग त्या फळाचे संरक्षण करणे. त्या करता गुरखे ठेवले जातात कोकणात माकडापासून फळ झाडांचे खुपच नुकसान होते. कधी वादळे होतात, जोराचा पाऊस पडतो. या सर्व संकटाच्या तावडीतून जो सुटतो तोच खरा कोकणी माणूस.

सर्व व्यवहारात फारच बारीक लक्ष ठेवून वाढवणे त्याला योग्य वेळेत मनुष्यबळ, वाहतूक व्यवस्था उपलब्ध होणे, त्या नंतर ज्यांन्या आंबे पोच झाले त्याचा आर्थिक पाठपुरावा करणे, योग्यरीतीने बॅंकेत जमा झाले याची नोंद घेणे यात साधारण पणे जून महिन्याची ५ तारीख उजाडते.

एकंदरीत माझ्या निरीक्षणानुसार या सर्व बाबतीत मनुष्यबळ आणि निसर्गावर अवलंबून रहावे लागते. वादळातील नुकसान सरकारकडून अतिशय अल्प मिळते. त्याचे योग्य ते परीक्षण केले जात नाही. तरी पण कोकणी माणूस नुकसान झाले म्हणून रडत बसत नाही हे विशेष. खरोखरच त्या जीवनाला सलाम.

मी स्वतः ३ मे ते १० मे पावस मुक्कामी होतो. ❖

# दूरदृष्टी (Vision)

◆ डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो! प्रत्येक क्षेत्रात मोठी दूरदृष्टी लाभलेली आणि तिचा यथोचित वापर करणारी व्यक्तीमत्वे ही विरळाच. स्वतंत्र सागरी आरमार उभे करणारे शिवराय, भविष्यात बलाढ्य कौरवांशी भिडावे लागणार आहे म्हणून पांडवांनी आपले सामरिक नेटवर्क का व कसे उभे करावे हे सांगणारा कृष्ण, गुजरातमध्ये शेतकऱ्यांचे 'अमूल' नावाचे बलदंड संघटन उभे करणारे वर्गीस साहेब, अमेरिकेचे भवितव्य सुरक्षित करण्यासाठी यादवी टाळणारे अब्राहम लिंकन आणि भारतीय बहुजनांचे व म्हणून लोकशाहीचे भवितव्य सुदृढ करण्यासाठी बाबासाहेबांनी केलेली घटनेची रचना, ही 'उत्तम दूरदृष्टी'ची ज्ञात असलेली उदाहरणे! परंतु बऱ्याच वेळा दूरदृष्टीचा अर्थ, व्याप्ती, प्रक्रिया, क्षमता इ. गोष्टी आम्हास शास्त्रोक्त पद्धतीने माहीत नसतात. हां, ढोबळमानाने हा शब्द आम्ही नेहमीच वापरतो. मुळात दूरदृष्टी म्हणजे दूरच्या मोठ्या निर्मितीचे किंवा रचनेचे सुस्पष्ट असे चित्र जाणण्याची व चितारण्याची क्षमता होय. इथे इंग्रजी शब्द व्हिजन (Vision)चा संदर्भ आवश्यक ठरतो. 'व्हिजन' बाळगणारे ते 'विशेष जन'! व्हिजन म्हणजे एक असे 'Practical' स्वप्न जे सत्यात उतरवता येऊ शकेल. असे सुयोग्य स्वप्न पहाण्याची क्षमता व प्रक्रिया म्हणजे 'व्हिजनिंग' किंवा 'दूरदृष्टी वापरणे'. इथे क्षमता म्हणजे 'कला' आणि प्रक्रिया म्हणजे 'विज्ञान'. कलेचा संदर्भ हा कल्पकता व निर्मिती या दोन क्षमतांशी जोडावा लागेल ज्या बऱ्याचशा व्यक्तिगत असतात. दूरदृष्टीचे विज्ञान म्हणजे ती वापरण्याचा शिस्तबद्ध कार्यक्रम.

आपल्याकडे दूरदृष्टी आहे की नाही हे तपासण्याच्या तीन कसोट्या आपण वापरू शकतो. यातील पहिली प्राथमिक कसोटी ही आपली बौद्धिक क्षमता तपासण्याची. ही क्षमता तीन चढत्या पातळ्यांवर असते. 'ग्रहण व स्मरण' (Grasp, Memory) ही पहिली सामान्य बौद्धिक पातळी जी साधारणपणे सर्वांकडे असते. दुसऱ्या पातळीवरची क्षमता म्हणजे 'विश्लेषण व उपयोजन' (Analysis, Application). तिसऱ्या पातळीवरील बौद्धिक क्षमता ही दूरदृष्टीसाठी अत्यावश्यक असते. ही क्षमता म्हणजे 'भविष्यकालीन घटनांची संभवनीयता जाणण्याची कुवत' व या घटनांचे व्यवस्थापन करण्याची कल्पनाक्षमता. अर्थात या तिसऱ्या बौद्धिक पातळीला दुसऱ्या पातळीवरील क्षमतेचा आधार हा लागतोच. दुसरी कसोटी ही Integrated Viewing ची म्हणजे समुच्चित किंवा सर्वस्पर्शी दृष्टिकोनाची. उद्देश, उद्देशप्राप्तीसाठी आवश्यक असा कार्यक्रम, अंमलबजावणीच्या प्रक्रिया आणि अंतिम यशाची मोजणी, अशा चारही गोष्टींचा एकत्रित विचार करण्याची क्षमता आवश्यक असते. तिसरी कसोटी ही पुन्हा बरीचशी व्यक्तिगत स्वरूपाची. दूरदृष्टी असणारा मनुष्य हा नेहमी 'एक्सलन्स'ची अपेक्षा ठेवत असतो. सिस्टीमनुसार 'परफेक्शन'वर काम करणारे खूप असतात. परफेक्शनच्या पलिकडे एक्सलन्स असते. कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व मिळवायचे असेल तर इतरांच्या पुढे असले पाहिजे. इथेच दूरदृष्टीची गरज असते. स्पर्धकांच्या परफेक्शनपेक्षा भविष्यातील आपले एक्सलन्स महत्त्वाचे. परफेक्शन व एक्सलन्स मधला फरक म्हणजे दूरदृष्टी. भविष्यकालीन परिस्थिती कशी असेल याचा अदमास घेत आजच 'नाविन्या'वर काम करावे लागते. दूरदृष्टीचे हे महत्त्वाचे फलित असते.

दूरदृष्टीचा उपयोग ज्या उद्देशासाठी करायचा आहे त्या उद्देशावर पूर्वी कुणी व कसे काम केले होते याचे 'बेंचमार्किंग' करणे अत्यावश्यक असते. Wheel should not be invented again असे म्हटले जाते. आपल्या दूरदृष्टीचा उपयोग हा आपण स्पर्धकांच्या पुढे असण्यासाठी करायचा असल्यास 'काहीतरी वेगळे व उत्तम' करण्याची गरज असते. दूरदृष्टीचा प्रभावी उपयोग हा वेगळी वाट चोखाळण्यासाठी करायला हवा. या प्रभावाचा म्हणजेच दूरदृष्टीच्या दर्जाचा विचार करायचा झाल्यास तो पाच पातळ्यांवर करावा लागेल. यातील सर्वोत्तम पातळी ही नवनिर्मिती (Creation)ची. दुसऱ्या पातळीवरचा प्रभाव हा नेहमीच्याच क्षेत्रात इतरांपेक्षा वेगळे (Differentiation) काही करण्याचा. तिसऱ्या प्रतीचा प्रभाव हा कार्यक्षेत्र बदलण्या (Diversification)चा असू शकतो. दूरदृष्टीचा सामान्य चौथा प्रभाव हा कार्यवृद्धी (Expansion)चा जो बहुतेक क्षेत्रात आढळतो. शेवटच्या पातळीवरचा दूरदृष्टीचा उपयोग हा अवघड

परिस्थितीमध्ये मिळवलेले यश टिकवण्याचा (Sustenance) असावा. असामान्य व्यक्तित्वाचे (Genius) लोक हे आपापल्या क्षेत्रात आवश्यकतेनुसार या पाचही पातळ्यांवरील प्रभावांचा एकत्रितपणे विचार करू शकतात. उदाहरणार्थ, नवनिर्मिती करताना हे Differentiation आणि Sustenance या दोन्ही गोष्टींबाबत दूरदृष्टी दाखवू शकतात. हे एखाद्या अत्यंत तरबेज, चलाख, वेगवान व मानसिकदृष्ट्या बलवत्तर असलेल्या बुद्धीबळपटूसारखे असतात जे पटावरील खूप पुढच्या परिस्थितीचे ‘अमूर्त’ आकलन करीत आक्रमण व बचाव अशा दोन्ही व्यूहरचनांचा उत्तम वापर करू शकतात. प्रसंगी हार टाळण्यासाठी हे आपला डाव बरोबरीत सोडविण्याचा मुत्सद्दीपणा दाखवू शकतात. तंजावरला असणारे सावत्र बंधू व्यंकोजीराजे, गोव्यातले पोर्तुगीज, विजापूरची आदिलशाही इत्यादींना हाताळताना शिवरायांनी अशीच चौफेर दूरदृष्टी दाखवली होती.

दूरदृष्टी वापरण्याचा मोठा व यशस्वी प्रयत्न करण्याआधी प्रत्येकाने आपली बलस्थाने, कमजोरी, संभाव्य संधी व आव्हानांचा काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे. असे करताना वर्तमान व भविष्यकालीन अशा दोन्ही शक्यतांचा विचार केला पाहिजे. म्हणजे आजचे सामर्थ्य हे उद्याची कमजोरी व आजची कमजोरी ही उद्याचे सामर्थ्य होऊ शकते. अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे सर्व स्पर्धकांच्या तुलनेत आपले असलेले सामर्थ्य (Competitive Advantage) हे सर्वाधिक व अतुलनीय कसे बनवता येईल व ते विविध प्रकारच्या देश - प्रदेशांमध्ये, बाजारांमध्ये आणि परिस्थितींमध्ये किती प्रभावशाली ठरेल याबाबतीतली दूरदृष्टी ही खूप महत्त्वाची ठरते. घोडदळ बनविणे, सागरी आरमार उभे करणे, किल्ल्यांची निवड व बांधणी करणे, वेळ निभावून नेण्यासाठी आवश्यक ते तह करणे इ. प्रत्येक मोठ्या व्यूहरचनेमागे शिवरायांची दूरदृष्टी होती. पाचही पांडव आपापल्या युद्धकलेत निपूण होते परंतु सामरिक व मानसशास्त्रीय व्यूहरचनांबाबतीत त्यांचा मुकाबला हा स्वतःच्याच गुरूशी म्हणजे द्रोणाचार्यांशी व्हायचा होता. आचार्यांच्या सोबतीला भीष्माचार्यांचे अजोड शस्त्रकौशल्य होतेच. व्युहरचनांच्या बाबतीत आपण संभवतः कमी पडू ही जाणीव असल्याने अर्जुनाने कृष्णाची बलाढ्य नारायणी सेना न घेता कृष्णालाच आपल्या बाजूने घेतले. ही अर्जुनाची दूरदृष्टीच म्हणायला हवी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या दूरदृष्टीने बहुजनांची भविष्यकालीन संभाव्य अवस्था जाणली होती. म्हणूनच त्यांनी बहुजनांना सल्ला दिला की मनोबल, मनुष्यबळ व द्रव्यबळ संपादन करा. आर्टिफिशल इंटिलिजंस (AI)चा नजिकच्या काळात कोणता, किती व कसा परिणाम होईल याबद्दल बरेच बुद्धिमान लोक आपली दूरदृष्टी आज पणाला लावताहेत. दूरदृष्टीचा सुयोग्य वापर करायचा असेल तर इतिहासातील धडे सुद्धा हुशारीने वापरावे लागतात. हीच महत्त्वाची बाब आज बऱ्याच बहुजनांच्या लक्षात येत नाही. बहुजनांना स्वतःचे सामर्थ्य कळलेले नाही कारण त्यांना स्वतःची मुळे माहीत नाहीत. सामर्थ्यच जर निद्रिस्त असेल तर दूरदृष्टीवर काम कसे करणार?




दूरदृष्टीबाबत एका ‘प्रॅक्टिकल’ गोष्टीचा आता ढोबळमानाने विचार करू या. वर चर्चिल्याप्रमाणे दूरदृष्टी असणारे लोक कमी असतात व ती आपल्याकडे आहे हे जाणणारे आणखीनच कमी असतात. आपण दूरदृष्टी बाळगतो हे ओळखण्यासाठी काही सोपी परिमाणे (लक्षणे) आपण वापरू शकतो. पहिले मोठे लक्षण हे अर्थात मागील काही महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेऊन लक्षात येऊ शकते. या घटनांचा तुम्ही पूर्वीच वेध घेऊ शकला असाल तर तुम्ही दूरदृष्टीचे धनी आहात, असे साधारणपणे म्हणायला हरकत नसावी. बऱ्याचवेळा दूरदृष्टी असणारा मनुष्य हा आजच्या काही महत्त्वाच्या गृहितकांना आव्हान देत असतो. तो एकप्रकारचा बंडखोरच असतो. त्यांस आज घडणाऱ्या सामान्य गोष्टींमध्ये फारसा रस नसतो. त्याची आसक्ती ही भविष्यकालीन मोठ्या शक्यतांबाबतची असते. या शक्यतांचा वेध घेण्यात तो अति मग्न असल्याने रोजच्या ढोबळ वागण्यात तो क्षुल्लक चुका करू शकतो. इतरांबद्दलची ईर्षा, क्रोध, भीती व अहंकारापासून तो अलिप्त असतो, कारण त्याची स्पर्धा ही स्वतःशीच असते. त्याला इतरांनी केलेल्या मुल्यमापनाची फारशी फिकीर नसते. भविष्याचा वेध घेण्यासाठी तो बरेच अमूर्त विश्लेषण करीत असल्याने त्यांस माणसांच्या गर्दीपासून अलिप्त रहायला आवडते. दूरदृष्टी बाळगणारा माणूस हा मुळात ‘बुद्धीप्रामाण्यवादी’ किंवा ‘तर्कनिष्ठ’ असल्याने तो अंधश्रद्धा आणि निरर्थक अवडंबरांपासून कोसो दूर असतो. तर्कनिष्ठतेमुळे तो कमी भावनाशील वाटतो व निर्णयप्रक्रिया राबविण्याबाबत तो कठोरही झालेला असतो.

लेखाच्या शेवटी आपण 'दूरदृष्टीच्या अंमलबजावणी'चा विचार करू या. दूरदृष्टीने एखादा मोठा निर्णय किंवा व्यूहनीती (Steategy) ठरविल्यास तिची पद्धतशीर अंमलबजावणी करण्यासाठी व्यूहात्मक नियोजन (Strategic Planning) करावे लागते. या नियोजनाचे चार मुख्य भाग पडतात. पहिल्या भागात अंमलबजावणी करताना येणाऱ्या आव्हानांचा व त्यावरील उपायांचा विचार करायला हवा. दुसऱ्या भागात अंमलबजावणीचे वेळापत्रक ठरवायला हवे. तिसऱ्या भागात अशा अंमलबजावणीचे दूरगामी फायदे व त्यासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीचा आढावा घेतला जातो. चौथ्या व अंतिम भागात 'अपयशातून सोडवणूक' (Damage Control) करण्याचा मार्ग आखला जातो. म्हणजे एखादी व्यूहरचना ही यशस्वी न ठरल्यास आणखी नुकसान सहन न करता अशा अपयशी व्यूहरचनेतून सहीसलामत बाहेर पडण्याचा मार्ग हा अधोरेखित केला जातो. बऱ्याचदा मी असे पाहतो की उत्तम दूरदृष्टी असणारे नायक हे योग्य व्युहात्मक नियोजन करत नाहीत नि त्यामुळे अशा दूरदृष्टीची यशस्वी अंमलबजावणी होत नाही. अनेक संस्था किंवा संघटनांमध्ये नायकाच्या दूरदृष्टीत त्याचे सहकारी नीटपणे सहभागी होत नाहीत कारण नायकाने आपला हा दूरदृष्टीकोन त्यांना नीटपणे समजावलेला नसतो. दूरदृष्टी असणे व तिचा सुयोग्य उपयोग करणे ही 'संस्था उभी करणाऱ्याची' (Institution Builder) विशेष क्षमता असते. असेच नायक हे साधारण 'देशा'चे परिवर्तन असाधारण 'राष्ट्रा'त करू शकतात!

Copyright © jakhotiya.com

Right to change/reproduce withheld, IPC copyright Act 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.

वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित.

---

आरोग्यम् धन संपदा

# १ चमचा तूप, प्रतिकारशक्ती वाढवण्यापासून ते वजन कमी करण्यापर्यंत फायदेशीर

**तूप हा एक प्रमुख पदार्थ आहे, तो प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात सहज उपलब्ध आहे. हे दुधाचा वापर करून तयार केले जाते. तूप हे लोणी आहे जे सामान्यतः फॅटी मानले जाते. तथापि, आयुर्वेदानुसार, तुपाचे काही आश्चर्यकारक आरोग्य फायदे आहेत. हे अँटीऑक्सिडंट्स, निरोगी चरबींनी भरलेले आहे जे आपल्या एकूण आरोग्यासाठी चांगले आहेत.**



सहसा लोक आपल्या आहारात तुपाचे सेवन सोडतात कारण त्यांना वाटतं याने वजन वाढतं. परंतु तुम्हाला माहिती आहे का की सकाळी उठल्यावर एक चमचा तूप खाल्ल्याने तुम्हाला अनेक फायदे मिळू शकतात. तर जाणून घेऊया.

**सकाळी एक चमचा तुपाचे फायदे**

तुपात जीवनसत्त्वे ए, डी, ई आणि के असतात जे आपल्या आतड्यांचे आरोग्य देखील वाढवतात. तूप आतड्यांच्या हालचाली सुधारण्यास देखील मदत करते. हे बद्धकोष्ठतेसारख्या कोणत्याही पाचन समस्या दूर ठेवते.

तूप शरीराला मजबूत बनवण्यास मदत करतं. हे आपल्या शरीरातून हानिकारक विष काढून टाकतं आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवतं.

बाजारात उपलब्ध रिफाइंड तेलांपेक्षा तूप जास्त सुरक्षित आहे. एका अभ्यासानुसार, तूप शरीराचे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतं आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढवतं.

ज्यांना सांधेदुखी आणि हाडांच्या समस्येने ग्रासले आहे, ते आपल्या दिवसाची सुरुवात तूपाने करू शकतात. तूप २ चमचे सांधे वंगण घालते आणि सांधेदुखी टाळते.

आपल्या शरीराला योग्य कार्य करण्यासाठी आवश्यक जीवनसत्त्वे आणि पोषक तत्त्वे आवश्यक आहेत. तूप जीवनसत्त्वे आणि पोषक तत्त्वांनी समृद्ध आहे आणि यामुळे ते पोषणाचे पॉवरहाऊस बनते. सकाळी एक चमचा तूप खाल्ल्याने तुमच्या शरीराला हे सर्व पोषक घटक योग्य प्रकारे शोषण्यास मदत होते.

तुपात चरबी कमी असते आणि वजन कमी करण्यास मदत करते. हे पचविणे सोपे आहे, आपली पाचन प्रणाली सुधारते आणि वजन कमी करण्यास मदत करते. तुपात ब्युटीरिक ॲसिड आणि मध्यम-साखळीचे ट्रायग्लिसराइड्स असतात जे तुम्हाला शरीरातील जिद्दी चरबीपासून मुक्त होण्यास मदत करतात. तुपामध्ये अमीनो असिड्स असतात जे पोटातील चरबी कमी करण्यास मदत करतात. ❖

# मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखा वर्धापनदिन २०२४

• सौ. अंजली मराठे, पुणे भ्रमणध्वनी : ९४२०४८१४४९

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखा वर्धापनदिनाचा कार्यक्रम दरवर्षी साधारण पणे २६ जानेवारीला होत असतो, परंतु या वर्षी 'मराठे प्रतिष्ठान' आयोजित 'अखिल भारतीय कुलसंमेलन' ६ व ७ जानेवारी २०२४ ला कणकवली येथे आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे यावर्षी सदर कार्यक्रम दिनांक १७ एप्रिल २०२४ या दिवशी वेदशास्त्रोतेजक सभागृह, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.

दि. १७ एप्रिल २०२४ रोजी 'प्रभु श्री रामनवमी'चे औचित्य साधून कै. संगीतभूषण पंडित राम मराठे यांचे स्मृती प्रित्यर्थ एखादा नाट्यसंगीताचा कार्यक्रम आयोजित करावा, असे अध्यक्ष विजय व कार्यवाह हेमंत यांच्या मनात होते व यासाठी चाचपणी चालू होती व त्याप्रमाणे आखणी करून कार्यक्रम सादर झाला.

प्रवेशद्वारात सौ प्राजक्ता हिने साकारलेल्या सुंदर रांगोळीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित कुलबांधव व भगिनींना चाफ्याचे फूल देऊन, तसेच अत्तर लावून स्वागत करण्यात आले, नंतर नोंदणी करून उपस्थित स्थानापन्न होत होते.

ठरविण्यात आल्यानुसार कार्यक्रमाची सुरुवात बरोबर ५.१५ वाजता दीप प्रज्वलनाने केली. यावेळेस 'मराठे प्रतिष्ठान'चे विश्वस्त श्री दत्तात्रेय मराठे, कार्याध्यक्ष विजय, सुप्रसिद्ध गायिका भाग्यश्री केसकर व पल्लवी पोटे, सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक पंडित प्रमोद जी मराठे, सौ अंजली अध्यक्षा पुणे शाखा, सौ मंजिरी कोषाध्यक्ष, सौ मानसी कार्यवाह पुणे शाखा हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्र संचलन सौ मंजिरी मराठे कोषाध्यक्ष पुणे शाखा यांनी केले. हीच आमची प्रार्थना हे स्वागत गीत मंजिरीताई व अंजलीताई यांनी सादर केले.



आपल्या परिवारातील ज्ञात अज्ञात व्यक्तीचे निधन झाले आहे त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

सौ अंजली अध्यक्षा पुणे शाखा यांनी 'मराठे प्रतिष्ठान'च्या कामाचा थोडक्यात आढावा घेतला.

'मराठे प्रतिष्ठान'चे कार्यवाह श्री. हेमंत व विजय यांची संकल्पना होती की यावर्षी कै संगीतभूषण राम मराठे जन्म शताब्दीनिमित्त काहीतरी चांगला कार्यक्रम करावा. प्रत्येक कार्यक्रम आयोजित करण्यात काही नियोजन लागते. सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक पं. प्रमोद मराठेजी व विजय याच्यात संगीत कार्यक्रमा संदर्भात प्राथमिक बोलणी झाल्यावर त्यांनी सुचवले की रामनवमी आहे तोच दिवस ठरवणे योग्य ठरेल व त्यानुसार कै संगीतभूषण




मराठे प्रतिष्ठान













राम मराठे जन्म शताब्दीनिमित्त व रामनवमीनिमित्त सुप्रसिद्ध गायिका भाग्यश्री केसकर, पल्लवी पोटे, ( कै संगीतभूषण पंडित राम मराठे यांच्या नाती) अद्वैत केसकर (पणतू) यांच्या बहारदार नाट्यसंगीताचा कार्यक्रम सादर झाला. साथीला हार्मोनियमवर सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक पं प्रमोद मराठे, तबल्यावर ऋषिकेश जगताप, निवेदिका सौ. संपदा मराठे थिटे. अतिशय सुरेख कार्यक्रम झाला. सर्व कलाकारांना नॅपकिन, बुके, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

सौ. अश्विनीने आभार प्रदर्शन केल्यावर उपस्थितांनी अल्पोपाहार घेतला. पराठा, कैरीडाळ, पन्हे, खोबरावडी (चैत्र महिना) असे रूचकर पदार्थ होते. जवळपास १०० जण उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यात कार्यकर्त्यांना खुपच मेहनत करावी लागली. यात कार्यकारिणी सदस्य अशोकराव सहकार्यवाह, राहुल, चंद्रशेखर, सौ व श्री बाळ काका, सौ प्राजक्ता, अश्विनी, संजय, ऋजुता, मानसीताई, मंजिरीताई, मोहनराव, विजय, अंजलीताई, अश्विनी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

सौरभच्या व्यग्र दिनक्रमात त्याने छान निमंत्रण पत्रिका तयार करून दिली. वातावरण खुपच गरम होते. त्यामुळेच उपस्थितांना व कलाकारांना खुपच गरम होत होते पण चांगल्या कार्यक्रमात श्रोते तल्लीन झाले होते.

सर्व कार्यक्रमावर अध्यक्ष जातीने लक्ष ठेवून होते.

सर्व जण घरी पोहोचल्यावर धुवांधार पाऊस पडला.

❖

पाककृती

# चमचमीत भरली भेंडी

**साहित्य** : भेंडी १०, तेल १ चमचा, जिरे १/२ चमचा, किसलेलं आलं १ इंच, किसलेलं खोबरं १ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर ५ चमचे, धणे पूड १ चमचा, जिरे पूड १ चमचा, गरम मसाला पूड १ चमचा, लाल मिरची पूड १/२ चमचा, आमसूल पूड १/२ चमचा, हरभराडाळीचे पीठ १ चमचा, तेल १ चमचा, शेंगदाणे कूट २ चमचे, तीळ १ चमचा, मीठ चवीनुसार



**कृती** : सारणाचे सर्व साहित्य एका भांड्यात एकत्र करावे. भेंडी धुवून पुसून घ्या. भेंडीच्या मध्यभागी कट कापून त्यात सारण भरावे. कढईत तेल गरम करून त्यात जिरे व आलं घालावे. त्यात भरलेली भेंडी हळूवार हाताने पॅनमध्ये ठेवा. हळूच मिक्स करा. पॅन झाकून दोन मिनिटे भेंडी शिजवा. दोन मिनिटांनी भेंडी हालवून पुन्हा झाकण ठेवून शिजवा. भेंडीचा रंग बदलून भेंडी शिजल्यावर गॅस बंद करा. सर्व्हिंग बाऊलमध्ये भेंडी ठेवा. वर कोथिंबीर, खोबरे घाला.

भेंडीची भाजी खायचा कंटाळा आला असेल किंवा भेंडीमध्ये नवीन चव हवी असेल तर ही भरली भेंडी चमचमीत खायला आवडेल. फ्रीज नसतानाही ही भाजी काही दिवस चांगली राहू शकते. तसेच आपण आवडीचे आणखी काही मसाले घालू शकतो.

❖

# हृदयात स्थान

'कोपरा' या शब्दाला माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मग तो उपनगरीय गाडीतील कोपरा असो, अथवा बाहेरगावच्या गाडीतील खिडकीचा कोपरा असो अथवा घरातील खिडकी असो. त्या कोपऱ्याचं अथवा खिडकीचं लहान-मोठे सर्वांनाच अप्रूप अथवा आकर्षण असतं. लहानपणी त्या खिडकीच्या कोपऱ्यात बसण्यासाठी, कुटुंबातील भावा-बहिणींमध्ये हमखास भांडणं होत, अजूनही होतात. कार्यालयातील कर्मचारीदेखील सकाळी कार्यालयात जाताना आणि संध्याकाळी घरी परतताना, उडी मारून, जिवाच्या आकांतानं लोकलमधला खिडकीचा 'कोपरा' मिळवण्यासाठी धडपडत असतात. ते पाहून काळजाचा ठोका चुकतो. इतर लोकांप्रमाणेच माझ्या घरातील खिडकी हा माझा आवडता कोपरा आहे. त्यातून मी सकाळी बाहेरील पक्ष्यांचं गुंजन ऐकतो. त्यांच्यासाठी पाणी ठेवतो. सकाळी चहा पिणं, वृत्तपत्र वाचणं, इत्यादी गोष्टींचा आनंद मी तिथेच बसून घेतो. बाहेर घडणाऱ्या चांगल्या-वाईट गोष्टींचा मी साक्षीदार आहे. या खिडकीचा कोपरा माझ्यासाठी प्रेरणादायी आहेच. याच खिडकीच्या कोपऱ्यात बसून मी गेली अनेक वर्षं वृत्तपत्रलेखन करत आहे. या कोपऱ्यात बसल्यावर शब्द सुचू लागतात. असा हा माझा वैशिष्ट्यपूर्ण कोपरा मी माझ्या मनात आणि हृदयात जपून ठेवला आहे.

**गुरुनाथ मराठे (पृ. ४०८)**, बोरिवली, भ्रणध्वनी ९९६९३८८४३४

# अगा जे घडले ची......

• संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

आस्तिक आणि नास्तिकच्या सीमारेषेवर सध्या हिंदू समाज आहे. कोणी ही सीमारेषा लक्षात न घेता स्वार्थाशी याला जोडतात. कोणी यांना विचारधारा मानतात तर कोणी अध्यात्म, भौतिक वाद, भोग यांच्याशीही जोडतात. काही घटना, प्रिय अथवा अप्रिय घडतात. यांचा संबंध शुभ दिवस, अशुभ दिवस, त्याज्य दिवस यांच्याशी जोडतात. खरंतर तारीख आणि वार यांच्या साठी कॅलेंडर प्रामुख्याने बघितले जाते. पण खपासाठी म्हणा की त्यांची म्हणजे कॅलेंडर छापणाऱ्यांची परंपरा म्हणा त्यात मराठी तिथी, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय विशेषतः संकष्टी चतुर्थीचा यांच्या वेळा, राशिभविष्य आणि शुभ, अशुभ / त्याज्य दिवस ही छापतात. काहींच्या मध्ये राहु काळ आणि मागच्या बाजूला मराठी पंचांगही त्या महिन्याचे छापतात. मराठी पंचांगात या व्यतिरिक्त बरेच काही समाविष्ट असते. कॅलेंडर मध्ये समाविष्ट तिथी, वार, नक्षत्र आणि शुभ, अशुभ दिवस याचा खुलासा पंचांगात सविस्तर असतो. शुभ अशुभ दिवस हे खरेतर जन्म नक्षत्र, रास, जन्म वेळ, पत्रिकेतील महत्त्वाचे ग्रह यांवर अवलंबून असते. पण आजकालच्या जमान्यात पंचांग पाहणारे जाणणारे विरळाच.

खरंतर सामान्य माणूस कॅलेंडर वर फक्त तारीख आणि वार बघतो. आणि एखादी चांगली किंवा अप्रिय, त्रासदायक घटना घडली की दिवस शुभ की अशुभ होता त्यावरून अप्रिय घटनेचे खापर त्या दिवसावर फोडतो.

असेच काहीसे पौर्णिमा आणि अमावास्येच्या बाबतीत होते. खरंतर प्रिय आणि अप्रिय घटना अमावास्या आणि पौर्णिमा यावरूनच घडतात असेच काही नाही. अध्यात्माचे म्हणणे हे प्राक्तनावरुन ठरतं किंवा ते विधिलिखित असते. यांत आणखीन भर म्हणजे अमावास्या आणि पौर्णिमेला घडणाऱ्या सरसकट नाही पण काही घटना, बाबी आणि गोष्टींचा संबंध हा कधी चंद्र आणि सूर्य यांची स्थिती, गुरुत्वाकर्षण, भरती ओहोटी आणि मनोरुग्णाची किंवा साध्याही माणसाच्या मानसिक अवस्थेशीही जोडला जातो.

नुकताच शुभ मानला जाणारा अक्षय्यतृतीयेचा दिवस आणि त्याच्या दोनच दिवसापूर्वी अशुभ दिवस मानली जाणारी अमावास्या होती. काही काही कॅलेंडर मध्ये अमावास्येच्या आधीचे दोन किंवा तीन दिवस त्याज्य किंवा अशुभ म्हणून नमुद केलेले असतात. म्हणजे या आठवड्यातील सोमवार ते शनिवार या मधील पहिले तीन दिवस अशुभ / त्याज्य आणि नंतर चे दोन दिवस शुभ होते. पण पाचही दिवसात घटणाऱ्या घटना, बाबी, गोष्टी कुणासाठी शुभ / प्रिय आणि कुणासाठी अशुभ / अप्रिय ठरल्यात. एखादे महत्त्वाचे किंवा साधेही काम झाले तर प्रिय आणि नाही झाले तर अप्रिय ठरणे हे खरेच शुभ / अशुभ दिवस असल्यानेच मानणे योग्य की अयोग्य?

याचे उत्तर तज्ज्ञ ज्योतिषी देईलही, पण प्रत्येक वेळी ज्योतिषा कडे जाणे आणि त्याचे म्हणणे पटणे वा न पटणे नाहीतर सीमारेषेवर लटकणे. काय तो निर्णय ज्याचा त्याने घ्यावयाचा.

माझ्या पुरता माझा निर्णय मी स्वतः एक कविता रचून घेतला आहे. तुम्हीही केंव्हाही अशा विविध बाबींच्या सीमारेषेवर लटकाल तेव्हा सीमारेषेचा गुंता सोडवायला माझी कविता तुम्हाला मदत करेल.

पौर्णिमा काय, अमावास्या काय,
पाप, वासना, पुण्य, वात्सल्य काय,
आनंद, दुःख, खेद, हर्ष, कसचे काय,
चिकटवलेले अर्थ, दुसरे तरी काय.

उगाच बदनाम असतात काही शब्द ,
समानार्थी, विरुद्धार्थी, विशेषणे,
अस काही कधीच नसते शब्दात,
शब्द फक्त शब्दच असतात.

भाषेला अलंकार जरी असतात,
तरीही भाषा साधीसुधी मायबोली,
अर्थाचा अनर्थ माणसे करतात,
समानार्थी, विरुद्धार्थी लेबले लावतात.

आई वडील, भाऊ बहीण.
काका काकू, मामा मामी,
नात्यांची वीण एका अर्थी,
पण लिंगभेदाच्या अर्थाने, विरुद्धार्थी.

चोर काय, अन साव काय,
नुसते शब्द म्हटले तर काय,
एकाच माळेचे सारे मणी.
अर्थबोध लक्षात न घेता फसेल कोणी

शकुन अपशकुन, श्रद्धा अंधश्रद्धा,
आस्तिक नास्तिक, ज्ञान अज्ञान,
नुसते शब्द आहेत म्हटले तर
पटेल का कधी कोणाला हे विज्ञान ?


प्रेम, माया, ममता, वात्सल्य,
द्वेष, घमेंड, क्रोध, अट्टहास,
सारे शब्दच, पण जन्मताच यांना,
अर्थांच्या कवचकुंडलाची मिजास.

मुळाक्षरे, स्वर आणि व्यंजने.
काना, मात्रा, उकार, वेलांटी,
यांनी रचली सारी शब्दसृष्टी,
अर्थाशी यांच्या मग पडल्या गाठी.

परिस्थिती, स्वभाव, व्यवहार
माणसे, जनावरे, पशुपक्षी,
यांची आणि या अक्षर वाङ्मयाची
अभद्र युती आपण फक्त त्याला साक्षी.

---

# चक्रीवादळ, समुद्र आणि मान्सून ......सारे काही जणू नेहमीचेच



वावटळी सारखं आयुष्य उडाले,
नि:शब्द झंझावात घोंगावला.
आयुष्याचे वेचलेले सुवर्ण कण,
पाला - पाचोळ्या सारखे विखुरले.

दाटलेले आभाळ अधिक काळवंडले,
गर्भार ढगांची होडी त्यात बुडाली.
एक पडछाया अनामिक ओढीने ,
अवकाश पोकळीत स्वैर भैर पसरली.

ओसाड माळरानावर कोल्हेकुई .
अंधकारमय निबीड आसमंत.
घनदाट जंगलात पावसाची पिरपिर,
फेर धरत घुमणारा मृदगंध श्रांत.

अबोल, झाकोळलेल्या दशदिशा,
धरणीवर जलबिंदूंचा मुसळधार सडा.
मध्येच लुकलुकणारा काजवा,
चहु बाजूला रातकिड्यांचा ओरडा.

भरुन आलेली तिन्हीसांज,
सागरावर भरतीचा माज.
लाटेवर लाटांचा गुंजतो गांज,
अंतर्मनात उठले तरंग निर्व्याज.

निसर्गाचा रूद्रावतार, कोण जबाबदार,
पर्यावरण कुस्करणारे आम्हीं बेजबाबदार.
समुद्राची कचरा कुंडी, आम्हीच ठेकेदार.
निसर्ग कोप मग सर्व काही रौंदणार.

सुनामी अन अतिवृष्टी चा भडिमार
खवळलेल्या सागराची तृष्णा फार
नेहमी प्रमाणे मग यमराजाला,
शतकोत्तर बळींचा पाहुणचार तृप्तवणार.

**संजय उवाच**
(संजय रामचंद्र मराठे)
९४२१७४०८९४

# हितगुज प्रतिक्रिया

◆ संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६), अमरावती — भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

आगळावेगळा विशेषांक. अहवालाचा फॉरमॅट, पण सादरीकरण अगदी सुरुवातीच्या मुखपृष्ठापासूनच एखाद्या शोधपत्राचे असल्याप्रमाणे.

संपादकीय, सम्मेलनाचा आढावा, विश्वस्तांचे मनोगत, सम्मेलनाची पार्श्वभूमी अशी एक एक पायरी ओलांडली अन् अंकाची पकड बांधून ठेवू लागली.

बाराव्या सम्मेलनाचा वृतांत अपूर्वा मराठे यांच्या लेखनातुन उलगडू लागला. समर्पक शब्दांत त्यांनी प्रत्यक्ष सम्मेलन डोळ्यासमोर उभे केले आहे. वर्णनात सविस्तरपणा आहे पण लांबण कुठेच नाही. प्रत्येक क्षण अचूक टिपला आहे. क्रिकेट मॅच प्रत्यक्षपणे पाहणे जरी आनंददायी असले तरी टी.व्ही. वर बारकावे पाहण्यात जशी मजा असते तशी मजा अपूर्वाच्या लिखाणातून व्यक्त होते.

सीमा शशांक मराठे यांचा ऋणानुबंध स्मरणिकेच्या जबाबदारीने प्रतिष्ठानशी अधिकच घट्ट होत असल्याचे त्यांच्या लेखनात पदोपदी जाणवते. 'किरात'चा सक्षम अनुभव आणि सर्वांच्या सहकार्याची मुक्तकंठाने केलेली प्रशंसा यातून त्यांची विनयशीलता प्रतिबिंबित होते. त्यांनी शब्दबद्ध केलेल्या मुलाखती वाचण्याचा योग यायचा आहे. सम्मेलनाच्या स्मरणिकेची प्रत प्रमोद मराठे (अमरावती) यानी माझ्यासाठी आणलेली आहे परंतु दोघांच्याही व्यग्रतेमुळे अद्याप पोहोचायची आहे.

अंजली आशुतोष मराठे यांच्या 'क्षणचित्रे'च्या माध्यमातून अनेकांना प्रत्यक्ष भेटल्याचा भास झाला.

या सम्मेलनाच्या निमित्ताने मला व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून सुहिताच्या रुपात एक जरा हटके व्यक्तिमत्वाची मैत्रिण मिळाली. पत्रकार, कलाकार, साहित्यिक अशा क्षेत्रात एक फ्री-लान्सर म्हणून काम करणाऱ्या या व्यक्तीने खूपच लवकर ग्रुपमध्ये स्वतःचे स्थान आणि ओळख निर्माण करून सम्मेलनातही स्वतःचा ठसा उमटवला आहे हे सम्मेलन काळातील ग्रुपवरील पोस्टमधून दिसतच होते.

आवर्जून उल्लेखनीय लेख म्हणजे डॉ. गिरीश जाखोटिया यांचा 'संवाद'. गिरीशजी एक सिद्धहस्त लेखक. त्यांच्या लेखनातून नेहमीच मला बरंच काही शिकायला मिळतं. या अंकातील 'संवाद' ही खूप काही सांगून जातो. काही शब्द हे स्वयंभू असतात उदाहरणार्थ, 'संस्कार, संवाद, विचार, प्रसिद्ध' इत्यादी. यांना 'सु' अक्षराचा उपसर्ग लावायची गरज नसते. फक्त संदर्भासहित स्पष्टता लेखनात असली की 'सु' ची गरजच पडत नाही हे कुठेही अधोरेखित न करता गिरीशभाईंच्या लेखातून सहज लक्षात येते.

अंकात भरपूर रंगीत फोटो आहेत. या फोटो गॅलरीने संमेलनाचा विशेषांक उजळून निघाला आहे. म्हणायला क्षणचित्रे पण सम्मेलनाच्या उपस्थितांसाठी स्मृतीचित्रे ठरणारी आहेत.

एका फोटोत 'हितगुज'चे पूर्व प्रकाशित अंक दिसले. आणखीही काही त्या टेबलावर दिसत आहे. यावरून एक कल्पना सुचली आहे. 'मराठे प्रतिष्ठान'च्या कार्यकारिणीने पुढील सम्मेलनाच्या वेळी यावर जरुर विचार करावा.

'माझी अशी कल्पना आहे की, (मी मुद्दाम सुचना म्हटले नाही कारण माझी ती पात्रता आणि हुद्दा नाही) पुढील सम्मेलनात एक ग्रंथ प्रदर्शन असावे. ज्यात 'मराठे प्रतिष्ठान'च्या सदस्यांनी लिहिलेली पुस्तके, आतापर्यंत प्रकाशित कुलवृत्तान्ताच्या दोन्हीही आवृत्तीच्या प्रती, सदस्यांना मिळालेले मान सन्मान, प्रशस्तीपत्रे जरुर ठेवावीत.'

असे कायमस्वरूपी संग्रहालय स्थापन करता आले तर त्याचाही विचार जरुर व्हावा.

**संजय उवाच**

## कविता

तुला मी आठवते दिनरात
तुझीच प्रेमळ मूर्ती विराजे
या वेड्या हृदयात।
आठवणीच्या ज्योती लावून
तुला शोधिते विरहतमातून
भेटीलागी आतुर होऊन
प्राण उभे नयनांत
तुला मी आठवते दिनरात॥

**– संजीवनी मराठे**

# पाठीराखा

◆ डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ. १२०), मुंबई
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६७४८१७

**ता**रीख १४ फेब्रुवारी १९९० रविवार होता. रात्री साडेनऊ वाजले होते. इतक्यात फोन खणखणला. पुण्याहून फोन होता ''काका खूप सिरियस आहेत, हॉस्पिटलात सलाईनवर ठेवले आहे. तेव्हा मोहन तू ताबडतोब निघ,'' ह्यांनी लागलीच पुण्याला जायची तयारी केली. आमची जेवणं वगैरे उरकून टीव्ही पाहात बसलो होतो. मुलं सुट्टीचा दिवस खेळून पेंगुळलेली होती. इतक्यात पुन्हा फोन आला. काकांनी ईहलोकीची यात्रा संपविली हो सांगणारा तो फोन होता. काकांचा अंत्यविधी संस्कार करून हे मुंबईला आले. नंतर दहाव्याला पाणी द्यायला म्हणून गेले, आल्यावर प्रवासाने दमले होते. म्हणण्यापेक्षा काकांच्या जाण्याच्या दुःखाने थकले होते. उदास झाले होते.

मी ह्यांना म्हणाले, ''एवढ्यातच तुमच्या दोन-तीन खेपा घाईघाईत पुण्याला झाल्या. आता काकांच्या तेराव्याला मी जाईन. काकूंनाही भेटता येईल. सांत्वन करता येईल.''

त्यावर हे म्हणाले, ''मधुराला घेऊन एकटी जाशील का? मधुरा त्रास देऊन प्रवासात तुला सतावणार नाही ना? हा काही कल्याण-ठाण्याचा जवळचा प्रवास नाही. चांगले ४ तास लागतील.'' मी म्हटले, ''रिझर्व्हेशन करून आणा गाडीचे म्हणजे आरामात बसता येईल, मधुरा झोपली तरी मांडीवर घेऊन बसता येईल, पुण्याला उतरल्यावर घरी जायला रिक्षा आहेच मग कसला त्रास?''

ह्यांनी तातडीने २५ फेब्रु. गुरुवारचे दादर मद्रासचे रीझर्व्हेशन काढून आणले. S/C/S डबा सीट नंबर १३ होता. दुपारी २.२५ ला दादरहून सुटते. अनेकदा नेहमी ही गाडी दादरहून उशीरा सुटते. असा तिचा लौकिक आहे. त्यादिवशी मी ह्यांना म्हटले, ''आज मधुराची शाळा बुडवू या, पाठवू या नको, नाहीतरी अभ्यास अजून कुठे बुडतोय?'' त्यावर त्यांची प्रतिक्रिया, ''गेल्या आठवड्यात दोनदा शाळा बुडाली तिची. एकदा ताप आला म्हणून तर दुसऱ्यांदा मुंजीला जावे लागले म्हणून. तेव्हा शाळेला दांडी न मारता तिला पाठवू या, मी शाळेतून तिला स्कुटरवरून लागलीच घरी आणीन मग निघूया उशीर होणार नाही!''

अस्मादिकांना पतिराजांच्या निर्णयापुढे मान तुकविण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. मी आर्य पतिव्रता पतिने मम म्हटले की मम म्हणणारी बापडी पत्नी दुसरे काय करणार? मधुरा शाळेतून येईपर्यंत मी सर्व आवरून तयारच होते फक्त तिचा फ्रॉक बदलायचा, पाणीबिणी प्यायचे लगेच निघायचे पण घरी आल्यावर तिने हा फ्रॉक नको तो नको असे नखरे करायला सुरुवात केली. ख्रिसमसबाबाच्या पोतडीतून असंख्य खेळणी निघावीत त्याप्रमाणे कपाटातले फ्रॉक खालीवर करत तिला विचारत होते हा फ्रॉक घालू का तो? आम्ही बालमानसशास्त्राला मानणारे, मुलांच्या आवडीनिवडी जपणारे, माझी आवड तिच्यावर का लादावी? हाच फ्रॉक घातला पाहिजे म्हणून! तिला फक्त लवकर फ्रॉकची निवड कर नाहीतर गाडी निघून जाईल असे सांगितले पण असल्या पोकळ धमकीला भीक घालणारी हल्लीची मुलं नव्हेत. आम्ही पालकही त्यांच्यापुढे खूप व्हरायटीज् ठेवतो मग त्यांना गोंधळाला वाव देतो. आमच्या लहानपणी एवढाले फ्रॉकच नव्हते आम्हाला, पटकन आई घालेल तो निमूटपणे घालून घ्यायचा. आज्ञाधारकपणे वागायचे आताशासारखी कपड्यांची रेलचेल नव्हती. जरूरीपुरते कपडे असायचे. पंतप्रधानांनी नव्या मुख्यमंत्र्यांची निवड करावी तशी तिने फ्रॉकची निवड केली एकदाची! निवडलेला फ्रॉक तिच्या अंगात चढवला तडक धावतच स्टेशन गाठले. या सर्व गडबडीत क्रिकेटवीराने जलद धावा काढावी तसा घड्याळाचा काटा शीघ्रगतीने धावा काढीत होता. गाडी डौलात प्लॅटफार्मला लागली होती. दहाजणीत उठून या दिसणारींमध्ये एखादी सौंदर्यवती असावी तशी गाडी दिसत होती. एरवीची लोकलगाडी म्हणजे काबाड कष्ट, धावपळ करणारी, मोलमजुरी करणारी चाकरमानी मोलकरीणच वाटते पण ही गाडी घरंदाज, खानदानी मालकीण असावी, जिच्या हाताखाली १०-१२ नोकर-चाकर आहेत अशी, दिमाखात, मोठ्या तोऱ्यात स्टेशनवर सजलेली उभी होती.

सर्व प्रवासी आपापल्या सीटवर, जागेवर जाऊन बसले होते. गाडी सुटायला काही क्षणांचाच अवकाश होता. निरोप द्यायला आलेली माणसे प्लॅटफार्मवर उभी होती. ह्यांनी तेवढ्याही घाईत प्लॅटफार्म तिकीट काढून आपली बहुमोल सेवा करणाऱ्या भारतीय रेलचा नियम कसोशीने पाळला. माझ्या कडेवर माझी मुलगी मधुरा वय वर्ष ३ होती. हात तुटलेल्या माणसाच्या शर्टाची बाही लोंबत असते तशी माझी पर्स खांद्यावर लोंबकळत होती.

धास्तावलेली, घामाघूम झालेली मी तशाच अवतारात जीवाच्या आकांताने धावत होते. याही स्थितीत तो चिमणा बालजीव मला खदखदून हसत होता. कधी नव्हे ती आई एवढी जोरात पळते आणि ती सुद्धा आपल्याला कडेवर घेऊन याचेच तिला अप्रूप वाटत असावे. हा प्रसंग ती अगदी मनमुराद एन्जॉय करीत होती. हे पुढे एखाद्या सैनिकासारखे हातात बास्केट घेऊन आगेकूच करीत रिझर्व्हेशन डबा शोधण्याच्या मोहिमेवर पळत होते. वृत्तपत्रांतील परीक्षांच्या निकालांचे नंबर शोधण्यापेक्षा इतक्या अल्पावधीत सीट नंबर शोधून काढणे महाअवघड काम होते. मी तर बेभान होऊन धावतच होते. प्लॅटफार्मच्या शेवटी शेवटी डबा असावा, इतक्यात टांगेवाल्याने घोड्यांना हॅट हॅट म्हणाल्या पूर्वीचा घोडा धावावा किंवा गाडीवानाने बैलांना हॉऽहॉ म्हणण्याआधीच बैल चालू पडावेत तशी रेल्वेने भोंग्याचा इशारा न देताही गाडी चक्क हालली मला वाटले झालं गाडी सुटली आता म्हणून लगेच प्रसंगावधान राखून जवळच्याच डब्यात घुसले. सुदैवाने तो लेडीजचाच डबा निघाला. मनात विचार केला गाडी तर पकडली. तिकीटाचे पैसे फुकट नको जायला. कल्याणला उतरू आणि रिझर्व्हेशन सीटवर जाऊन बसू. तेवढ्यात हे खेकसले जोरात, ‘‘उतर, उतर लवकर, पुढेच रिझर्व्हेशन डबा आहे, गाडी नाही चुकायची, तू धाव फक्त जोरात,’’ विचार करायला उसंत नव्हती तशीच गरीब गायीप्रमाणे उतरले, धावायला लागले हे पुढे, मी मागे, कडेवर मधुरा असल्याने धावताना फार जड जात होते. पायात गोळे यायला लागले होते. मांडीत पेटके येऊ लागले, गाडी सुटणार या भीतीने काळजाचे पाणी पाणी होत होते. नवऱ्याचाही राग येत होता. तशीच जीव घेऊन धावत होते. तेवढ्यात आकाशात वीज चमकावी तसा विचार मनात चमकला, एकदम कल्पना सुचली झटकन प्लॅटफार्मवर निरोप द्यायला आलेल्या माणसांपैकी एकाच्या हातात मी मधुराला दिली, दिली कसली ‘कोंबली’ म्हणा, त्याला घाईघाईतच हातवारे करीत सांगितले, ‘‘अहो प्लीज मला ही गाडी पकडायची आहे, मुलीला कडेवर घेऊन मी धावू शकत नाही जोरात, तुम्ही माझ्या मागे धावा मुलीला घेऊन’’ तो धावत आला बिचारा, मलाही सुटसुटीतपणे वेगाने पळता येऊ लागले, हे रिझर्व्हेशन डब्यात बॉस्केट ठेवून अशा पावित्र्यात उभे होते की समजा बायकोने गाडी पकडली नाही आणि चुकली तर लगेच बॉस्केट ओढून हातात घेता येईल. मी हे उभे होते तो डबा कसाबसा पकडला, भोंगा झाला, त्या माणसाने मधुराला माझ्या हातात दिली आणि गाडी सुरू झाली. भारावलेल्या आवाजात त्या सद्‌गृहस्थास मी धन्यवाद दिले. थँक्स म्हटलं ह्यांना म्हटलं चहा पाजा त्यांना, त्यांच्यामुळेच मला गाडी मिळाली. मधुराला घेऊन इतक्या लांब धावू शकले नसते मी. आणि रिझर्व्हेशन सीटवर विराजमान झाल्यावर सुटकेचा श्वास टाकला, भानावर आले, धावून इतका दम लागला होता की दोन मिनिटं कंठातून शब्द फुटेना मग रिलॅक्स झाले.

शेजारच्या सीटवरची बाई म्हणाली, ‘‘आम्ही म्हटले ही बाई अजून स्टेशनवर धावते आहे. गाडी मिळते की नाही? बघतो तर आमच्याच शेजारी येऊन बसली!’’

‘‘एवढ्या टोकावर का घरातून निघायचं, नेहमी प्रवासात गाडीच्या वेळेअगोदर जाऊन स्टेशनवर बसावे.’’ दुसरीने अनुभवामृताचा डोस पाजला. एका सद्‌गृहस्थाची प्रतिक्रिया, ‘‘तुम्ही Lucky हं गाडी मिळाली म्हणून!’’ एखादी सासुरवाशीण सोशिक सून जशी निमूटपणे बोलणी ऐकून घेत असते तशी सर्वांची वक्तव्ये, प्रतिक्रिया निमूटपणे ऐकून घेतल्या. मी मनात म्हटले आतापर्यंत पुष्कळ प्रवास केला. अगदी लांबचाही केला पण अशी वेळ कधी आली नाही. ह्या कठीण प्रसंगाला प्रवासात पहिल्यांदाच सामोरी गेले. हिंदीतल्या ‘यातायात’ शब्दाचा खरा अर्थ समजला. रोमहर्षक, चित्तथरारक, अविस्मरणीय प्रसंगाची माझ्या मर्यादित अनुभवविश्वात भर पडली. ह्या अनुभवाने मला खूप काही दिले. हा अनुभव मला खूप काही सांगून गेला. एक वेगळेच महत्त्वाचे भरीव आश्वासन मला हा अनुभव देता झाला. मी मनात विचार केला समजा त्या माणसाने माझ्या मागून मुलीला कडेवर घेऊन धावण्याची मदत केली नसती तर गाडी पकडण्यात मी असफल झाले असते. मला त्या माणसात देवाचेच रूप दिसले. भक्ताची पाठराखण करणारे, भक्ताच्या हाकेसरशी धावून जाणारे, भक्ताला अडचणीत मदत करणारे, भक्ताची काळजी घेणारे आणि मी ही स्वतःला ‘भक्त’ म्हणविते.

एखाद्या विवाहितेला वाट पाहून पाहून पुष्कळ वर्षांनी दिवस गेल्यावर जितका आणि जसा आनंद व्हावा तसा अपूर्व आनंद मला गाडी मिळाल्याने झाला. गाडी मिळाल्याचे समाधान काही आगळेच होते. एका वेगळ्याच रूपात देव दिसल्याचे.

पुण्याला पोहोचल्यावर ह्यांचा मुंबईहून फोन आला, ‘‘पोचलीस ना घरी? रिक्षा मिळाली का? धावून दमली असशील!’’ इत्यादी आणि ह्यांनी एकदम बॉम्बच टाकला की, ‘‘तो मधुराला कडेवर घेऊन प्लॅटफॉमवर धावणारा तुला मदत करणारा माणूस महाराष्ट्रीयन नव्हता, मराठी भाषेचा त्याला गंधही नव्हता, तो कट्टर तेलगू भाषक होता, तू मधुराला त्याच्या हातात टाकल्यावर व पळायला लागल्यावर क्षणभर तो बिचकला ही काय भानगड बिनगड नाही ना, नस्ती आफत येईल म्हणून तो गोंधळला होता.’’ हे ऐकताच मला हसू आवरणे पराकोटीचे कठीण गेले, फोनवर बोलूही शकले नाही पुरते फक्त हसू आणि हसूच! वाटलं हा प्रसंग पाहून आर.के. लक्ष्मणना व्यंगचित्र काढावेसे वाटेल! ❖

# इतिहासाचा सखोल अभ्यास आणि योग्य मांडणी हेच स्वातंत्र्यवीर सावरकर चित्रपटाचं यश

• मंजिरी मराठे (पृ. ३९२)

रणदीप हुड्डा यांना दीनानाथ मंगेशकर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. लेखन, दिग्दर्शन, अभिनय आणि निर्मिती या सर्वच भूमिका ज्यांनी यशस्वीपणे पेलल्या त्या रणदीप हुड्डा यांचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट ज्यांना विलक्षण भावला त्या प्रत्येकालाच पुरस्काराच्या बातमीनं आनंद झाला असणार.

सावरकर कोण हे माहीत नसताना, त्यांच्याबद्दल वाचलेलं नसताना, थोडंफार वाचल्यावर ते 'व्हिलन' आहेत अशी झालेली भावना ते प्रचंड अभ्यास झाल्यावर सावरकर नावाच्या माणसावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचा झालेला दृढनिश्चय आणि त्यातून जन्माला आलेली अप्रतिम कलाकृती हे रणदीप हुड्डा यांच्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाचं वैशिष्ट्य.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चित्रपटात केवळ सावरकर असणार नाहीत तर त्यांचे समकालीनही असणार हे ज्यांना कळलं आहे, असे चित्रपटाचे लेखक रणदीप हुड्डा. चित्रपटात 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' म्हणणारे लोकमान्य टिळक असणार, भगतसिंग आणि इतर क्रांतिकारकही असणारच कारण सावरकरांच्या आयुष्यात या सर्वांना अनन्यसाधारण महत्त्व होतं, हे ज्यांना कळलं आहे ते रणदीप हुड्डा. त्यांनी 'जरा जास्तच अभ्यास केला', पण तो सत्कारणी लागला, हे सावरकर चित्रपट बघितल्यावर, त्यांच्या मुलाखती ऐकल्यावर आपल्याला मान्यच करावं लागेल.

आपल्या क्रांतिकार्याचं स्फुर्तीपद सावरकरांनी काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांना दिलं पण गुरूंचे गुरु मानलं 'केसरी'ला, लोकमान्यांना. सावरकर म्हणतात, 'लोकमान्य टिळक खड्गाची मूठ होते. आम्ही क्रांतिकारक त्याचे पाते होतो. खड्गाची मूठ जरी पाते होऊ शकत नाही तरी पाते हे मुठीच्याच आधारावर रणकंदनी लवलवते. पाते मुठीच्याच मनोगताचे पारणे फेडीत असते.'



२२ जुलै १९०५ला वंगभंगाची अधिकृत घोषणा झाल्यावर लोकमान्यांनी 'आता आणीबाणीची वेळ आहे' म्हणत जनसमुदायाला ललकारलं आणि स्वदेशी, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार या चतु:सुत्रीची घोषणा केली. सावरकरांनी पुण्यात दसऱ्याला, ७ ऑक्टोबर १९०५ला विदेशी कपड्यांची पहिली होळी पेटवली. त्याला टिळक, परांजपे यांचे आशीर्वाद लाभले.

१८९७ मध्ये पुण्यात प्लेगच्या साथीत ब्रिटिश अधिकारी रँडनं केलेल्या अत्याचारांचा प्रतिशोध म्हणून चापेकर बंधूंनी रँडचा वध केला. त्यांनाही लोकमान्याचे आशीर्वाद होतेच. चापेकर बंधूंच्या बलिदानानं अस्वस्थ झालेल्या सावरकरांनी 'देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'मारित मारित मरेतो झुंजण्याची' शपथ घेतली. 'अभिनव भारत' या देशातल्या पहिल्या क्रांतिकारी संस्थेची स्थापना केली आणि ज्योतीने ज्योत पेटत गेली. सावरकरांनी पिस्तुलं आणि बॉम्ब बनवण्याची कृती मिळवली. पांडुरंग बापट यांच्याकरवी कलकत्यात पोहोचवली आणि खुदिराम बोस यांनी देशात पहिला बॉम्बस्फोट घडवला आणि आपल्या मातृभूमीसाठी वयाच्या १९व्या वर्षी हौतात्म्य पत्करलं. विनायक दामोदर सावरकर या आपल्या धाकट्या भावाला क्रांतिकार्यात मन:पूर्वक साथ देणारे गणेश दामोदर

सावरकर अंदमानची वाट चालू लागले. त्यांचं सारं कुटुंब रस्त्यावर आलं. त्याचा प्रतिशोध म्हणून लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायलीचा वध केला. धिंग्रांच्या फाशीने व्यथित झालेल्या अनंत कान्हेरे यांनी हिंदुस्थानात जॅक्सनचा वध केला. (त्यांचे साथीदार कृष्णाजी कर्वे, विनायक देशपांडे यांना कान्हेरे यांच्या समवेत फासावर चढवण्यात आलं तर वामन जोशी यांना १० वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा झाली.) कान्हेरे यांचं वय होतं १८, कान्हेरे यांनी जे पिस्तुल वापरलं ते सावरकरांनी लंडनहून पाठवलेल्या पिस्तुलांपैकी एक होतं. त्यामुळे क्रांतिकारकांचे मुकुटमणी सावरकर यांची शिक्षा निश्चित होती आणि सुरू झालं सावरकरांचं अंदमान पर्व. १० वर्षांचा हा कालावधी 'दोन सीन' मध्ये उरकला गेला नाही. कारण चित्रपट हुड्डा यांनी बनवला आहे.

सावरकर जरी अंदमानात बंदिस्त असले तरी त्यांनी पेटवलेली क्रांतीची आग प्रज्वलित होत राहिली ती 'मॅझिनी', '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या त्यांच्या ग्रंथांनी. जप्त झालेले ते ग्रंथ घरोघरी पोहोचले, क्रांतिकारकांची गीता ठरले. हे दाखवण्यासाठी हुड्डा यांनी पुण्यातल्या गणेशोत्सवाची पार्श्वभूमी वापरली आहे, त्या कल्पनेला मनापासून दाद द्यायला हवी. श्री गणेशाची जी मूर्ती दाखवली आहे त्यातही कल्पकता आहे. ती मूर्ती आहे भाऊसाहेब रंगारी या पुण्यातील अतिशय जुन्या गणेश मंडळाची. भाऊसाहेब रंगारी हेदेखील क्रांतिकारकांच्या संपर्कात होते, त्यांच्याकडे शस्त्रास्त्रं होती, वाड्यात ती लपवण्याची, गुप्त बैठकांची सोय होती. ही सर्व माहिती कळल्यावर, ती गणेशमूर्ती पाहिल्यावर, तोपर्यंत चित्रीकरण पूर्ण होत आलेलं असूनही हुड्डा यांनी गणेशोत्सवाचं चित्रीकरण केलं. याचाच अर्थ माहिती मिळाली तरी त्यांची मांडणी योग्य पद्धतीनं करता येणं महत्त्वाचं आणि ते हुड्डा यांना व्यवस्थित साध्य झालं आहे.

'हुड्डा यांना चित्रपटात भगतसिंग पण दाखवायचे होते. भगतसिंग कशाला? हे सावरकरांचं बायोपिक आहे ना?' हा प्रश्नच प्रश्नकर्त्याचं अज्ञान दाखवणारा आहे. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या सावरकरांच्या पुस्तकाचा उल्लेख आला की, अभ्यास असेल तर, त्या ग्रंथातून भगतसिंग यांना मिळालेली प्रेरणा हा फारसा परिचित नसलेला विषय येणारच. रणदीप हुड्डा यांचा 'अति अभ्यास' कोणा एकासाठी त्रासदायक ठरला म्हणे, पण त्या अति अभ्यासामुळेच एक चांगला चित्रपट निर्माण झाला हे निश्चित.

अंदमानातल्या केवळ १३ बाय ७ फुटांच्या कोठडीत दिवस अक्षरशः ढकलताना सावरकरांची होत असलेली तगमग, खायला उठलेला वेळ, कोठडीत त्यांनी अस्वस्थपणे मारलेल्या येरझाऱ्या, घाणेरडं अन्न खाऊन, बघून होणाऱ्या उलट्या, नैसर्गिक विधीला जाता येत नाही म्हणून झालेली घालमेल आणि त्यासाठी कोठडीचा वापर करावा लागल्यावर स्वतःचीच वाटणारी लाज आणि तरीही मिळालेला दिलासा हे हुड्डा अतिशय समर्थपणे साकारू शकले. कारण ते स्वतः अतिशय संवेदनशील कलाकार आहेत. त्यांनी सावरकरांमधला एक माणूसही या चित्रपटातून लोकांसमोर आणला आहे. सेल्युलर कारागृहात क्रांतिकारकांचे होणारे हाल पहिल्यांदाच इतक्या ठळकपणे दाखवले गेले आहेत. चित्रपट पाहणाऱ्यांच्या मनातून ते कधीही पुसले जाणार नाहीत आणि अनेकांना इतिहास वाचनाला प्रवृत्त करतील.

सावरकरांचे हिंदुत्वाचे विचार, त्यांच्यावरचे पेन्शन (नव्हे भत्ता) माफीपत्रांचे, गांधी हत्येतील सहभागाचे चुकीचे आरोप हे हुड्डा यांनी अतिशय स्पष्टपणे आणि थेट मांडले आहेत. सावरकरांविषयी कुठलाही आकस नसलेल्यांच्या मनात आता त्याविषयी कुठलाही संदेह उरलेला नाही आणि हेच या चित्रपटाचं खूप मोठं यश आहे.

केवळ एक तुळशीपत्र देऊन सावरकरांनी अंदमानात धर्मांतरितांची शुद्धी करून घेतली. त्या शुद्धीच्या प्रसंगासाठीदेखील रणदीप हुड्डा यांना दाद द्यायला हवी. हा सावरकरांवरचा चित्रपट असला तरी त्रिवर्ग सावरकर बंधूंव्यतिरिक्त, वासुदेव बळवंत फडके ते चापेकर बंधू, खुदिराम बोस ते भगतसिंग, सुखदेव, राजगुरू अशा अनेक सशस्त्र क्रांतिकारकांनी आपल्या मातृभूमीसाठी हौतात्म्य पत्करलं, त्यांची बलिदानी गाथा चित्रपटातून आपल्यासमोर साकारते, हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. 'दे दी हमें आजादी बिना खड्ग बिना ढाल' ही एक खोटी कथा वर्षानुवर्ष पसरवण्यात आली, पण आपल्या देशात इतकं काही घडलं आणि हे आपल्यापर्यंत कधी पोहोचलंच नाही, हीच चित्रपट पाहणाऱ्यांची भावना असते.

१८, २०, २२ वर्षांच्या अनेक तरुण क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपलं रक्त सांडलं. एकाच्या हौतात्म्यातून दुसरा क्रांतिकारक बलिदानासाठी सिद्ध होत होता. अशा लाखोंच्या त्यागानं आपण आज स्वातंत्र्य उपभोगू शकतो आहोत याची जाणीव या चित्रपटामुळे निर्माण होते आहे. तो इतिहास हुड्डा यांनी अतिशय प्रभावीपणे मांडला आहेच पण पुढे सावरकरांच्या डोळ्यांसमोर तरळणारे त्या तरुण हुतात्म्यांचे चेहरे आपल्यालाही त्यांच्या हौतात्म्याची पुनःपुन्हा आठवण करून देतात. आपल्यावर विनाकारण लागलेले लांच्छन दूर करण्याचा, तसंच लाखो क्रांतिकारकांच्या त्यागाचा आणि बलिदानाचा खराखुरा इतिहास जनतेसमोर आणल्याबद्दल प्रत्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकरही रणदीप हुड्डा यांचं कौतुक करत असतील, त्यांना शुभाशीर्वाद देत असतील.

❖

# प्रारंभ 'समाजक्रांती पर्वा'चा

• मंजिरी मराठे (पृ. ३९२)

**साऱ्या हिंदूंनी एकसंध समाज व्हावे**

आपला इतिहास हा पराभूतांचा इतिहास आहे, असं आपल्या मनावर सतत बिंबवलं जातं आणि आपणही ते खरं धरून चालतो. पण इतिहासाच्या अभ्यासातून सावरकरांनी असं दाखवून दिलं की, आपण जिंकत होतो, पण पुन्हा, पुन्हा परकीय आपल्याला पराभूत करत होते. कारण आपण एक होऊन लढत नव्हतो. कित्येकदा तर आपण एकमेकांविरुद्ध लढलो. त्यामुळे आपण साऱ्या हिंदूंनी एकसंध समाज म्हणून एकत्र यायला हवं असं त्यांना वाटत होतं.

**क्षात्रतेजच नष्ट करणाऱ्या महात्म्याची वाट रुंदावली**

१९२० मध्ये जहाल विचारांच्या लोकमान्य टिळकांचं निधन झालं आणि आपलं क्षात्रतेजच नष्ट करणाऱ्या 'अहिंसा परमो धर्मः' या विचारानं जाणाऱ्या महात्म्यांची वाट चांगलीच रुंदावू लागली. त्याच महात्म्यानं मुस्लिमांचं लांगूलचालन करण्यासाठी हिंदूंचा तर अजिबातच नाही पण भारतातील मुस्लिमांचाही काडीमात्र संबंध नसलेल्या खिलाफत चळवळीत आपणहूनच उडी घेतली. 'खिलाफत नव्हे आफत' असं सांगणाऱ्या सावरकरांना, खिलाफतीत देशाच्या फाळणीची बीजं दिसत होती. गांधीवादी व खिलाफत चळवळीतील बंदिवानांची आणि सावरकरांची रत्नागिरी कारागृहात भेट होत असे. गांधीवाद्यांचं दुटप्पी वागणं, आम्ही गांधींच्या मागे नाही तर गांधी आमच्या मागे आहेत ही खिलाफतवाद्यांची दर्पोक्ती, यातून देशाचं राजकारण कुठल्या दिशेला चाललं आहे, हे सावरकरांना जाणवत होतं.

**रत्नागिरीतील एकांत कोठडीत 'हिंदुत्व' संकल्पनेला शब्दरूप दिलं**

ब्रिटिश या आपल्या शत्रूला देशाबाहेर घालवण्यासाठी, दुसऱ्या शत्रूनं – अफगाणिस्थानच्या अमानुल्लानं हिंदुस्थानवर स्वारी करून एकमेकांच्या साहाय्यानं ब्रिटिशांची सत्ता उखडून टाकायची अशी गांधींची आत्मघातकी कल्पना होती त्यानुसार गांधी अमानुल्ला करार ठरला होता. हिंदूंचं अस्तित्वच पूर्णपणे धोक्यात आलं होतं, अशा परिस्थितीत जाती, पंथ, भाषा आणि प्रांतात विभागलेल्या हिंदूंनाच, हिंदू म्हणजे कोण याची ओळख करून देण्याची वेळ आली आहे, हे जाणून सावरकरांनी रत्नागिरी कारागृहात, ६ x




८ फुटांच्या एकांत कोठडीत आपल्या मनातल्या 'हिंदुत्व' संकल्पनेला शब्दरूप दिलं. इंग्रजीत लिहिलेला हा त्यांचा पहिला ग्रंथ १०१ वर्षांपूर्वी, १९२३ मध्ये 'मराठा' या टोपणनावानं अधिवक्ता विश्वनाथ विनायक केळकर यांनी प्रकाशित केला. १९२६-२७च्या सुमारास सावरकरांचे धाकटे बंधू डॉक्टर नारायण सावरकर यांनी त्या इंग्रजी ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला.

**प्रारंभ झाला १३ वर्षांच्या 'समाजक्रांती पर्वा'चा**

आता पुढची पायरी होती ती हिंदू संघटनांची, समाज सुधारणांची. सावरकरांनी थोडी थोडकी नाही तर १४ वर्ष कठोर कारावास भोगला होता. आता आवश्यकता होती कारागृहातून मुक्तता मिळवण्याची. हिंदू समाजाला विळखा घालून बसलेल्या सप्तशृंखला तोडण्यासाठी त्यांनी स्वतःच्या पायात स्थानबद्धतेची बेडी ठोकून घेतली.

६ जानेवारी १९२४ ला येरवडा कारागृहातून मुक्तता झाल्यावर, ८ जानेवारीला सावरकर रत्नागिरीला पोहोचताच प्रारंभ झाला. १३ वर्षांच्या 'समाजक्रांती पर्वा'चा. या तेरा वर्षांच्या 'वनवासात', ब्रिटिशांच्या 'नजरेखाली' असूनही त्यांनी अफाट सामाजिक कार्य केलं. केवळ रत्नागिरीतील अस्पृश्यता नष्ट केली नाही, तर जात्युच्छेदन चळवळ उभारली. आपल्या पूर्वास्पृश्य बांधवांना मंदिर प्रवेशच नाही, तर गाभाऱ्यात जाऊन पूजा करण्याचा मान मिळवून दिला. त्यांना मुख्य धारेत आणण्याचा प्रयत्न केला. पण १०० वर्षांनंतर आज पुन्हा एकदा आपण जातीजातीत विभागले जात आहोत. भलेही आपण सर्व क्षेत्रात प्रगतीपथावर असू, पण एक समाज म्हणून आपली अधोगतीच होत आहे. आपापसातली तेढ प्रचंड वाढते आहे, मतांच्या राजकारणासाठी जाणूनबुजून वाढवली जात आहे. त्यामुळे आज आवश्यकता आहे हिंदूंच्या एकजुटीची. हिंदुस्थानातच हिंदूंच्याच अस्तित्वासाठी लढण्याची.

***(लेखिका स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या कोषाध्यक्ष आहेत.)***

# बघण्याच्या कार्यक्रमाची रंगतदार कथा

• सदानंद मराठे, सायन

भ्रमणध्वनी : ९०११०१६१२६

माझं सीएचं शिक्षण पूर्ण होऊन मी एका औषध बनवणाऱ्या कंपनीमध्ये नोकरीला लागलो. ही गोष्ट आहे १९८८ सालामधील. शिक्षण पूर्ण होऊन बऱ्या ठिकाणी नोकरीला लागल्यामुळे साहजिकच घरच्यांचा पुढचा विषय होता माझ्या लग्नाचा! मला विचारण्यात आलं, 'तुझं तू कुठे जमवलेलं नाही ना रे?' माझी कुणाला काही विचारण्याची देखील हिमत नव्हती, अशा परिस्थितीत माझं मी जमवण्याचा प्रश्नच नव्हता, हे मी घरच्यांना सांगितलं. मी लग्न करण्यासाठी तयार असल्याचं कळल्यावर सगळ्या नातेवाईकांना कळवण्यात आलं. हळूहळू ओळखीपाळखीतून स्थळं येऊ लागली, पण मी ऑडिटमध्ये असल्यामुळे माझी फिरतीची नोकरी होती. एकदा गेलो की, दोन-तीन आठवडे मी बाहेरगावीच असायचो.



रंगपंचमीचा दिवस होता. मी त्या दिवसांत घरी असल्यामुळे आमच्या घरच्यांनी पाच-सहा स्थळांना बोलावलं होतं. रंगपंचमीला दुपारी एक स्थळ बघण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. मी आणि माझे काही अविवाहित मित्र रंगपंचमी खेळण्यासाठी पाण्यानं भरलेले फुगे घेऊन जवळच्याच एका सोसायटीमध्ये जात होतो. अचानक पोलिसांची गाडी आली, त्यातून दोन-तीन हवालदार उतरले आणि आमच्या हातात पाण्याने भरलेले फुगे बघून आम्हाला काही समजायच्या आत त्यांच्या गाडीत कोंबलं आणि सरळ पोलिस स्टेशनला नेलं. कुणी तरी ही बातमी माझ्या घरच्यांना सांगितली, कारण त्यावेळेस दुपारचे ३ वाजले होते आणि चार वाजता आमच्याकडे 'बघण्याचा' कार्यक्रम होता.

माझ्या मोठ्या भावानं तडक पोलिस स्टेशन गाठलं. आमच्यासारखी बरीच मंडळी तिकडं पकडून आणलेली होती, त्यामुळे माझ्या भावाला मी कुठे आहे? हे शोधायला जरा वेळच लागला. मला बघितल्यावर माझ्या भावानं कुणाची तरी ओळख काढून वरिष्ठ पोलिस निरीक्षकाला गाठलं आणि त्याला अडचण समजावून सांगितली. नशिबानं, ते पोलिस निरीक्षक चांगले निघाले आणि मला 'काय तुम्ही शिकले-सवरलेले लोक असे वागता. पुन्हा असं करू नका' असं सांगून सोडून दिलं.

मी घाईघाईनं घरी आलो आणि अंघोळ करून रंगाने माखलेले कपडे बदलून शांतपणे जणू काही घडलंच नाही अशा अविर्भावात बसलो होते. आमचा 'बघण्याचा' कार्यक्रम पार पडला. मला ती मुलगी आवडली, पण तिच्याकडून होकार येणं बाकी होतं. नशिबानं दोनच दिवसांनी तिच्या वडिलांनी त्यांचा होकार कळवला. नंतर साखरपुडा आणि पुढे लग्न व्यवस्थित पार पडलं. पण तोपर्यंत हा किस्सा तिला आणि तिच्या घरच्यांना माहीत नव्हता. यथावकाश हा किस्सा माझ्या बायकोला सांगितला. आजही तिच्या घरची मंडळी हा किस्सा आठवला की, हसून-हसून माझी चेष्टा करतात.

❖

## हसरे हितगुज

तास संपल्याची घंटा झाली. गणिताचे शिक्षक वर्गातून बाहेर पडले. आणि शिक्षकांच्या खोलीत आले. हात धुवून त्यांनी आपला डबा उघडला. एका डब्यात पोळी होती तर दुसरा डबा



चक्क रिकामा होता. ते रिकाम्या डब्यात पोळी बुडवून खात होते. तेवढ्यात तिथे मराठीचे शिक्षक आले. ते आश्चर्याने म्हणाले, ''सर, आपण तर रिकाम्या डब्यात पोळी बुडवून खात आहात!''

गणिताचे शिक्षक हसून म्हणाले, ''मी भाजीला 'एक्स' मानले आहे.''

# भरीव आर्थिक प्रगतीचे संकेत

◆ डॉ. अभिजित फडणीस



**लो**कसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सादर झालेला अर्थसंकल्प पुढील सरकार येऊन ध्येयधोरणे घोषित करेपर्यंत केवळ राज्यशकट चालण्यासाठी खर्चाचे नियोजन करणारा, असाच अपेक्षित होता. त्यामुळेच दर वर्षीप्रमाणे यंदा आर्थिक सर्वेक्षणही प्रसिद्ध झाले नाही. केवळ गेल्या दशकाचा आढावा घेणारा एक अहवाल प्रसिद्ध झाला. त्याचाच संदर्भ ठेवून अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे भाषण छोटेखानी झाले असले, तरी गेल्या दहा वर्षातील सरकारच्या कामगिरीवर भाष्य करण्याची संधी त्यांनी मुक्त हस्ते घेतली. सरकारच्या प्राधान्य क्षेत्रांबद्दल सूतोवाच करून पुढे अधिक तपशिलात ते मांडण्याची संधी मिळेल'', हा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

सन २०१९ मधील अंतरिम अर्थसंकल्प आणि नंतर त्याच पक्षाचे सरकार निवडून आल्यानंतर आलेला नियमित अर्थसंकल्प यातील खर्च, उत्पन्न, कर्ज आदी मुख्य आकडेवारीमध्ये खूप अंतर नव्हते. त्यामुळे अर्थतज्ज्ञ या अंतरिम अर्थसंकल्पाच्या महत्त्वाच्या संकेतांकडे लक्ष ठेवून होतेच. भांडवली बाजाराचे लक्ष आर्थिक स्थैर्य, तुटीच्या व्यवस्थापनाची दिशा याकडे होते. आर्थिक शिस्त हा आत्ताचा कळीचा मुद्दा आहे. त्यावरच व्याजदराची आणि पर्यायाने वृद्धिदराची दिशा अवलंबून असेल. संपूर्ण जगाच्या तीन टक्क्यांच्या तुलनेत साडेसहा-सात टक्के दराने वाढणारी वेगवान मोठी अर्थव्यवस्था म्हणून विश्वपटलावर भारत स्थिर झाला असला, तरी सरकारच्या आकडेवारीकडे आणि प्राधान्यक्रमांकडे उद्योगाचे लक्ष राहतेच. सरकारचा खर्च उत्पन्नापेक्षा जेवढा अधिक तेवढी वित्तीय तूट अधिक, सरकार बाजारातून कर्ज उचलण्याची आवश्यकता अधिक, तेवढी सरकारी कर्जरोख्यांकडून बाजाराची व्याजाची अपेक्षा अधिक, तेवढेच खासगी उद्योगांना लागणाऱ्या कर्जावर व्याज अधिक. याचा सरकारी आणि खासगी नवीन गुंतवणुकीवर विपरीत परिणाम होतो.

करोनाच्या कठीण काळामध्ये 'एकदम प्रचंड खर्च वाढवा आणि संभाव्य मंदीवर मात करण्यासाठी लोकांच्या हातात अधिक पैसे द्या,' या तथाकथित प्रगत राष्ट्रांनी केलेल्या उपद्व्यापाचा सवंग अनुनय भारताने धोरणात्मदृष्ट्या टाळला. अनेक अर्थतज्ज्ञ असेच करावे म्हणून ओरड करत असूनही सरकारने दबावाला बळी न पडता धोरणीपणाने आणि टप्प्याटप्प्याने पायाभूत साधने, उद्योग आणि संकटात सापडलेल्या अर्थव्यवस्थेतील घटकांवर लक्ष केंद्रित करत करोनाच्या पहिल्या लाटेवर मात होत असताना २०२०-२१ च्या मध्यापासून नव्या धोरणांची आणि खर्चाची पोतडी उघडली. त्यामुळे आपली वित्तीय तूट सावधपणे वाढली. तिचा नऊ टक्क्यांहून अधिक हा स्तर त्या काळासाठी आवश्यक, मात्र दीर्घ काळाच्या दृष्टीने माघारी फिरवण्याचा टप्पा नक्कीच होता आणि पूर्वी घोषणा केल्याप्रमाणे २०२५-२६ पर्यंत तूट साडेचार टक्क्यांवर आणू शकेल का, याकडेच भांडवली बाजाराचे लक्ष होते. गेल्या अर्थसंकल्पात तूट ५.९ टक्के असूनही प्रत्यक्षात या वर्षी ५.८ आणि पुढील वर्षी ५.१ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा उल्लेख बाजारांच्या कानात मधुर संगीताप्रमाणे पोहोचला.

करोनाच्या थैमानामुळे विस्कळीत झालेली पुरवठा साखळी आणि त्यातच अतोनात पैसे लोकांच्या हातात ठेवल्याने प्रगत देशात झालेली प्रचंड महागाई यामुळे जगात महागाईचा भडका उडाला. २०२२ च्या सुरुवातीला रशिया-युक्रेन संघर्षाने त्यात तेल

ओतले. ब्रिटन, अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांना भयावह महागाईला तोंड द्यावे लागले आणि त्यावर मात करण्यासाठी त्यांनी व्याजदर वेगाने वाढवले, ज्याचा अनुनय डोळसपणे भारतीय रिझर्व्ह बँकेलाही करावा लागला. अनेक राष्ट्रांच्या चलनांना संकटात टाकणारा हा काळ होता. मात्र या कठीण काळातून आपण तावून-सुलाखून बाहेर पडलो आहोत. अनेक राष्ट्रांच्या तुलनेत आपली महागाई बऱ्यापैकी नियंत्रणात राहिली.

पूर्वीच्या अर्थसंकल्पात सार्वजनिक बँकांना सरकारने द्यायचा आधार हा विषय आता कालबाह्य झाला आहे, कारण आता त्या सुदृढ पायावर उभ्या आहेत. 'जी-२०' परिषदेच्या भारताने केलेल्या नेतृत्वाच्या पार्श्वभूमीवर नव्या क्षेत्रांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आज अर्थमंत्र्यांनी अधोरेखित केली आहे. 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान'सोबत आता 'जय अनुसंधान' अशी सरकारची भूमिका आहे. नवीन स्थायी स्वरूपाच्या ऊर्जा स्रोतांबरोबरच खासगी क्षेत्रानेही आपापल्या क्षेत्रात संशोधनावर लक्ष केंद्रित करावे, यासाठी उपाययोजनांचे संकेत अर्थमंत्र्यांनी दिले आहेत. ५० वर्षांची एक लाख कोटी रुपयांची व्याजमुक्त कर्जे उपलब्ध करून देण्याची घोषणा महत्त्वाची. इलेक्ट्रिक वाहनांच्या अधिक वापराच्या दृष्टीने, पायाभूत साधनांच्या दृष्टीनेही उपाययोजनांचे संकेत येणाऱ्या काळात अधिक स्पष्ट होतील.

अर्थमंत्र्यांनी सवंग लोकानुनय टाळला असला, तरी नवीन दोन कोटी घरे बांधण्यास पुढील पाच वर्षांत प्राथमिकता देण्यासह मध्यमवर्गीयांना घरे बांधणे किंवा खरेदी करण्यासाठी साहाय्यभूत नवी योजना आणण्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत. सौरऊर्जे द्वारे एक कोटी घरे आत्मनिर्भर करण्याचा सरकारचा हेतू मोठ्या जनसमूहांच्या आशा पल्लवित करणाराच आहे. 'लखपती दीदी'ची संख्या एक कोटीने वाढवून महिला सबलीकरण आणि दुर्बल घटकांचे सक्षमीकरण असा दुहेरी उद्देश साधण्याचा सरकारचा हेतू आहे. तात्कालिक लाभाऐवजी स्थायी बदल घडवणाऱ्या योजना सरकार राबवत आहे. ते अतिशय चांगले आहे. करविषयक काही बदल केले गेले नसले, तरी जुन्या साचलेल्या करविषयक मागण्या रहित करण्याचा निर्णय एक कोटी करदात्यांना सुखावणारा ठरेल.

सन २०१४-१५ मध्ये पायाभूत साधने निर्माण करणारा भांडवली खर्च सव्वादोन लाख कोटी रुपये होता तो यंदा पाचपट, म्हणजे ११,११,१११ कोटी रुपये एवढा वाढला आहे. रस्ते, विमानतळ, रेल्वेद्वारे माल-प्रवासी वाहतूक, डिजिटल आणि सामाजिक क्षेत्रातील पायाभूत साधने या दृष्टीने जनसामान्य त्याची गुणवत्ता अनुभवत आहेत. मात्र, त्याचबरोबर व्याजापोटी सरकारला द्यावी लागणारी वार्षिक रक्कमही सव्वाचार लाख कोटींवरून जवळजवळ १२ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. त्यामुळे पुढील काळातील वित्तीय शिस्त आणि अर्थव्यवस्थेतील व्याजदर हळूहळू स्थायी स्वरूपाने कमी करण्याची निकड भासणार आहे. याचे परिणाम गुंतवणूकदारांच्या आर्थिक गणितांवर होणार आहेत आणि म्हणून त्यांची आर्थिक साक्षरता आणि सजगता अधिकच आवश्यक ठरणार आहे.

भारतातील वैयक्तिक आणि कंपनी कररचना स्थिर झाल्या आहेत. वस्तू-सेवा कराच्या माध्यमातून अर्थव्यवस्था गतिमान झाली आहे आणि करसंकलन सुलभ आणि अनेकदा सरकारच्या अपेक्षांपलीकडे होत आहे. देशांतर्गत पर्यटन वाढत आहे आणि त्याचे आयाम आणि संधीदेखील. दुष्टचक्रात सापडलेल्या देशापासून सुष्टचक्रातून वेगवान वृद्धीचा लाभ सर्वदूर पोहोचवण्याच्या टप्प्यावर भारत उभा आहे. संरक्षण, उद्योग, शेती यातील आत्मनिर्भरता आणि कल्पकता दोन्ही वाढत आहे. पुढील दहा वर्षांत वेगाने वाढण्यासाठी पायाभरणी उत्तम झाली आहे आणि तरुणाईसाठी प्रचंड संधी उपलब्ध होत आहेत. मागास राष्ट्रापासून, विकसनशील आणि आता विकसित अशा दिशेकडे आपण वाटचाल करीत आहोत. आपल्या स्वतःच्या स्वप्नांबरोबरच एका विकसित राष्ट्राच्या प्रगतीचे साक्षीदार आणि सहभागी म्हणून प्रत्येकाने आपले योगदान देण्याची संधी सोडता कामा नये.

❖

## दातदुखीपासून दूर राहा



दातांचे दुखणे दुसरे एखाद्या जास्त गंभीर समस्येचा सिग्नल असू शकतो. म्हणूनच ती अजिबात दुर्लक्षू नका, त्वरित डेंटिस्टला भेटण्याचा प्रयत्न करा. तोपर्यंत दुखऱ्या जागेस बधीर करण्यासाठी लवंगेच्या तेलाचा वापर व लवंग चावा. आपण ॲक्युप्रेशरचाही वापर करू शकता. एका अभ्यासात असे आढळले की अंगठा व तर्जनीमध्ये इंग्रजी व्ही आकाराचा जो भाग असतो त्यावर ७ मिनिटे बर्फाचा तुकडा चोळला तर दातदुखी कमी होते. जर उजव्या बाजूचा दात दुखत असेल तर उजव्या हाताच्या व डाव्या बाजूचा दात दुखत असेल डाव्या हाताच्या या भागावर ही प्रक्रिया आजमावून पाहावी.

# ‘संगीत मंदारमाला’ पुन्हा गुंफताना...

• मुकुंद मराठे (पृ. ३६८) भ्रमणध्वनी : ९८९२३१५७३१

नाटक हा फक्त मराठी रंगभूमीचा नव्हे, तर भारतीय रंगभूमीचा एक अनमोल असा वारसा आहे. ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक, नाट्यतज्ज्ञ डॉ. इब्राहिम अल्काझी असे म्हणतात, ‘‘जागतिक रंगभूमीला मराठी रंगभूमीचे अत्यंत महत्त्वाचे योगदान म्हणजे मराठी संगीत नाटक हेच आहे. अभिजात संगीताला लालित्याची मर्यादा घालून त्याचा नाट्यपरिपोषासाठी उपयोग करून घेणे, हे मराठी संगीत नाटकाचे मूलतत्त्व आहे.’’



सन १८८१ मध्ये ‘शाकुंतल’, ‘सौभद्र’पासून सुरू झालेली ही नाटकं सत्तर-ऐंशी पदांनी युक्त असत. सात ते आठ तास वन्समोअरसह रात्रभर चालणारे प्रयोग, वेळ व गाणी कमी होत साठच्या दशकात अखेर चार ते पाच तासांवर व २०-२५ गाण्यांवर स्थिरावले. साठोत्तरीत संगीत नाटकाला सर्वार्थाने संजीवनी देण्याचे काम केले, ते विद्याधर गोखले यांनी. काव्यशास्त्र विनोद, उत्तम नर्मविनोदी लेखनशैली; तसेच उत्तम गीतकार, पद्यरचनाकार, मराठी, हिंदी, उर्दू व संस्कृत या चारही भाषांचे उत्तम ज्ञान असलेल्या अण्णा गोखल्यांनी १९६० मध्ये ‘पंडितराज जगन्नाथ’ आणि ‘सुवर्णतुला’ ही दोन संगीत नाटके रंगभूमीवर आणली. संगीत रंगभूमीचा किंचित ओसरलेला व मरगळलेला काळ जाऊन तिला नवचैतन्य प्राप्त झाले. पाठोपाठ अण्णांनी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले संगीतनृत्यप्रधान संगीत नाटक ‘मंदारमाला’ देऊन.

**संगीत हाच नाटकाचा केंद्रबिंदू...**

साठ-सत्तरच्या दशकात ‘बैजू बावरा’, ‘संगीतसम्राट तानसेन’, ‘गुंज उठी शहनाई’, ‘झनक झनक पायल बाजे’, ‘बसंत बहार’, ‘अमर भूपाळी’ असे गायक, वादक, संगीतकार व नृत्यकार अशांच्या जीवनावर आधारित चित्रपट आले आणि त्यातील रागदारी संगीतामुळे ते प्रचंड लोकप्रियही झाले. त्यातूनच बहुदा अण्णा गोखले यांच्या मनामध्ये संगीत गायक-नायकावर आधारित नाटक लिहिण्याचा विचार आला असावा. रसिकप्रेमी, कलाप्रेमी संपादक ह. रा. महाजनी हे रामभाऊंचे निकटचे स्नेही. महाजनी यांच्या सहवासातूनच विद्याधर गोखले आणि रामभाऊ यांचा घनिष्ट परिचय झाला. स्वामी हरिदास, मिया तानसेन, सदारंग, अदारंग असे बंदिशकार अर्थात नायक-गायक आपल्या देशात होऊन गेले. त्यांच्यातीलच चार-पाच गायकांच्या जीवनातील प्रसंगांचा आधार घेऊन, तर काही काल्पनिकतेचा वापर करून एका अवलिया संगीतकाराच्या संगीत जीवनप्रवासावर विद्याधर गोखले यांनी नाटकाची जुळवाजुळव सुरू केली. रामभाऊच्या पारंपरिक तडफदार आक्रमक गायकीबरोबरच प्रसंगी सादर होणारी हळुवार गायकीने विद्याधर गोखले खूप प्रभावित झाले होते आणि त्यानी मनोमन असे ठरवले, की या नाटकाचा मुख्य नायक आणि या संपूर्ण नाटकाचा कप्तान अर्थात संगीतकार एकच असेल... तो म्हणजे राम मराठे. प्रो. बी. आर. देवधर, जगन्नाथबुवा पुरोहित, विलायत हुसेन खाँसाहेब, नारायणराव व्यास, वामनराव सडोलीकर, विनायकबुवा पटवर्धन, लक्ष्मणराव बोडस अशा अनेकांच्या भेटीतून गायक संगीतकारांचे स्वभाव विशेष ते जाणून घेत होते. अण्णांना सर्वांत मौल्यवान मार्गदर्शन मिळाले, ते त्यांचे नाट्यगुरू केशवरा दाते यांचे.

‘मंदारमाला’ची सुरुवात दोन गायकांमधील जुगलबंदीने होते आणि नंतर फ्लॅशबॅक पद्धतीने अण्णांनी नाटकाची बांधणी केली होती. मात्र केशवराव दाते यांनी अण्णांना सांगितले, की ही जुगलबंदी या नाटकाचा खऱ्या अर्थाने उत्कर्षबिंदू ठरेल, तेव्हा फ्लॅशबॅक पद्धतीच्या मोहात न पडता ही जुगलबंदी नाटकाच्या शेवटी ठेवावी. केशरावांचे ते बोल खरे ठरले. दुसऱ्या अंकाच्या शेवटी रत्नमालेला मंदार शिकवायला तयार होतो आणि त्यासाठी रागमालासदृश ऋतुचक्र असे खूप सुंदर काव्य अण्णांनी लिहिले होते आणि रामभाऊंनी संगीतबद्ध केले होते. नाटकाची लांबी वाढेल म्हणून ते नाटकात घेतले नाही; अर्थातच पुढे ‘कट्यार’मध्ये ती रागमाला वेगळे स्वरूप घेऊन आली, हे सर्वज्ञात आहे. ‘कट्यार’चे अनेक संदर्भ ‘मंदारमाला’मध्ये आपल्याला

सापडतात. विषप्रयोग, पोथी, तानपुरा, जुगलबंदीसदृश शेवट... दारव्हेकर मास्तर आणि विद्याधर गोखले दोघेही नागपूरचे आणि अत्यंत निकटचे मित्र; तसेच अभिषेकीबुवा आणि रामभाऊ मराठे हे दोघेही गुणीदासांचे शिष्य अर्थात गुरुबंधू.

गायक-नायक अशा संगीतभूषण पं. राम मराठे यांच्या चतुरस्र संगीताने व भुमिकेने नटलेल्या 'मंदारमाला'ची संहिता तयार झाली. राजगायक म्हणून प्रसाद सावकार यांचे नाव नक्की करण्यात आले. ज्योत्स्ना मोहिले यांना रत्नमालेची भूमिका देण्यात आली. सोबत पंढरीनाथ बेर्डे, शंकर घाणेकर, राजाराम शिंदे, नृत्यप्रविण नाईक इत्यादी मंडळी होती. रंगभूषेसाठी बाबा वर्दम आणि कृष्णा बोरकर. नेपथ्य कृष्णा जुन्नरकर यांनी केले होते. तुलसीदास बोरकर (ऑर्गन), भोजराज साळवी (तबला) आणि मधुकर बर्वे (व्हायोलिन) असे दमदार साथीदार होते. चार महिन्यांच्या अथक तालमीनंतर २६ मार्च १९६३ अर्थात गुढीपाडव्याच्या दिवशी 'संगीत मंदारमाला' रंगभूमीवर आले आणि त्याने इतिहास घडविला. या नाटकाच्या यशामुळे संगीत रंगभूमीला संजीवनी प्राप्त झाली. त्यानंतर 'मत्स्यगंधा', 'कट्यार', 'ययाती आणि देवयानी', 'मेघमल्हार', 'जय जय गौरीशंकर', 'स्वरसम्राज्ञी' अशी ५५ ते ६० संगीत नाटके रंगभूमीवर आली. विविध नाट्यसंस्थांद्वारे 'मंदारमाला'चे पुढे बाराशेहून अधिक प्रयोग झाले. पं. राम मराठे; तसेच सहकलाकार प्रसाद सावकार, ज्योत्स्ना मोहिले, शंकर घाणेकर, राजाराम शिंदे, पंढरीनाथ बेर्डे तर पुढे रजनी जोशी, कुसुम शेंडे, मधुवंती दांडेकर, भालचंद्र पेंढारकर, जयमाला शिलेदार, प्रभा अत्रे, चंदू डेगवेकर, अशोक सराफ, विजय गोखले अशा कलाकारांनी हे नाटक अजरामर केले.

नाटकाचे लेखक विद्याधर गोखले आणि पं. राम मराठे या दिग्गजांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'संगीत मंदारमाला'ची पुनर्निर्मिती करण्याचे ठरले. 'संगीतभूषण पं. राम मराठे फाउंडेशन', 'मुंबई मराठी साहित्य संघ' आणि 'कलाभारती'च्या सहकार्याने हा प्रयोग करण्यात आला. आजच्या काळात या नाटकाची निर्मिती करताना अर्थातच जुना प्रेक्षक डोळ्यांसमोर होताच; त्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद देणे महत्त्वाचे होते. चार तासांहून अधिक कालावधीचे हे नाटक तीन तासांच्या आत आणताना मनावर दगड ठेवावा लागला. लोकप्रिय गाण्यांबरोबरच ध्वनिमुद्रिका न निघालेली आणि 'ललितकलादर्श'ने हे नाटक चालवायला घेतल्यानंतर घातलेली भालचंद्र पेंढारकरांची दोन अनवट गाणी व अशा इतर सुंदर चाली रसिकांपर्यंत आणि नव्या पिढीपर्यंत पोचवायच्या होत्या. आमच्या 'मराठे'शाही घराण्याची गायकी गाणारी युवा मंडळी असल्याने तोच गायकी बाज ठेवण्यामध्ये यश आले. घरातच अत्यंत सक्षम असे रागदारी संगीत गायन करणारी, उत्तम गुरुकुल तालमीत शिकणारी युवा पिढी स्वरांगी, प्राजक्ता, भाग्येश आणि इतर सज्ज होते. राजगायक मदन गोपाळ म्हणून देवगडच्या सुधांशू सोमणला हेरले. सहकलाकारांमध्ये मकरंद पाध्ये, नृत्य अभिनेत्री प्रिया टीपाले-देव, रमेश चांदणे. हाताची विशिष्ट 'पोश्चर' वा देहबोली घेऊन कुठलेही अतिआविर्भाव आणि अनावश्यक हातवारे करू नयेत, तयारीच्या ताना मारू नयेत, हे सगळे हळहळू शिकवावे लागले. वरद सोहनी या कलाकाराची लाजवाब ऑर्गनसाथ मिळाली; शिवाय मोहन पेंडसे (व्हायोलिन), धनंजय पुराणिक, आदित्य पानवळकर (तबला) आणि प्रणव दांडेकर (पखवाज) अशी साथसंगत झाली.

कोणत्याही गीताला चाल लावताना त्याचा मुखडा अत्यंत आकर्षक आणि ऐकताक्षणी पकड घेणार असला पाहिजे, असे संगीतकार म्हणून बाबांचे मत होते. 'जय शंकरा गंगाधरा', 'सोहम हर डमरू बाजे', 'हरी मेरे जीवन प्राण आधार', 'जयोस्तुते उषादेवते', 'कोण असशी तू नकळे मजला', 'तारील हा तुज', 'बसंत की बहार आयी' ही सगळी पदे याची साक्ष देतात. अनवट व नवीन राग, हवेली संगीत, भजन, ठुमरी, गझल, दरबारी नृत्यगायन जुगलबंदी, शिकवणीचा प्रसंग, रागमाला अर्थात ऋतुचक्र, नृत्य, सवाल-जवाब असे विविध गायनप्रकार 'मंदारमाला' नाटकात समाविष्ट आहेत. नाटकाचा कळसाध्याय म्हणजे या नाटकातील 'बसंतकी बहार आयी' ही जुगलबंदी! अहिरभैरव, देसकार, तोडी, काफी, खमाझ ठुमरी, गौडमल्हार, पिलू, बैरागीभैरव, हुसेनी कानडा, संगम केदार, हिंडोल, मालकंस, चंद्रकंस, जोगकंस, बिहाग, बसंत बहार असे अनेक राग यात वापरले असून जोगकंस, बैरागी असे राग संगीत नाटकात प्रथमच वापरले गेले आहेत. या नाटकाचा प्रथम प्रयोग जन्मशताब्दी वर्षात ठाणे महानगरपालिकेच्या 'पं. राम मराठे संगीत समारोहा'त सादर झाला. माझी ज्येष्ठ भगिनी वीणा नाटेकर, बंधू संजय मराठे, दीपक गोडबोले, सौरभशेठ; तसेच विजय गोखले, शुभदा दादरकर, डॉ. विद्याधर ओक, प्रसाद सावकार. 'कलाभारती'चे सुरेंद्र दातार इत्यादींचा अनमोल सल्ला आणि महत्त्वाचे म्हणजे सुधीर ठाकूर यांचे संपूर्ण तांत्रिक साह्य, 'मुंबई मराठी साहित्य संघमंदिर' यांचे नेपथ्य यामुळे हे नाटक उभे करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. आता हाच प्रयोग नाट्य संमेलनाच्या शताब्दीला सांगलीत करण्याचे भाग्य लाभले आहे.

❖

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ५ वी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–
इयत्ता ८वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%– रु. ७००/–
८०% ते ९०%– रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–
C.A., L.L.B., Engineer, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)
राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–
याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
(लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.)
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

यशस्वी व पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी दि. १ सप्टेंबर २०२४ पर्यंत आपापल्या गुणपत्रिकांची प्रत 'मराठे प्रतिष्ठान'च्या पत्त्यावर पोस्टाने अथवा info@marathepratishthan.org या ई–मेलवर पाठवावी. विजेत्यांची सूची या वर्षीच्या वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्यात येईल. तरी निकाल प्राप्त झाल्यावर लगेचच गुणपत्रिका पाठवाव्यात ही विनंती.

निकाल उशिरा लागले तर वरील मुदतीनंतर देखील गुणपत्रिका पाठविल्यास पारितोषिकांसाठी विचार होऊ शकेल. मात्र त्या परिस्थितीत प्रथम क्रमांकासाठीची पुरस्कृत पारितोषिके देणे शक्य होणार नाही. ऑगस्ट/सप्टेंबर २०२४ मध्ये होणाऱ्या या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारितोषिकांचे वितरण करण्यात येईल त्यामुळे त्याच्या १० दिवस अगोदरपर्यंत येणाऱ्या गुणपत्रिकांचाच विचार पारितोषिकासाठी होऊ शकेल याची कृपया नोंद घ्यावी.

**ई–मेल : info@marathepratishthan.org**

## लोकशाहीचा खेळ

चंडीगढ येथे होणाऱ्या महापौर निवडणुकीच्या मतपत्रिकेत खुद्द निवडणूक अधिकाऱ्यांनी केलेली खाडाखोड पाहून, तळपायाची आग मस्तकात गेली. न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे, या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून, त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे. थोडक्यात कुंपणच जर शेत खाऊ लागले, तर त्याला कोण काय करणार? मग मतदारांनी मतदान का व कोणासाठी करायचे? यापूर्वी विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकीत, समाजकंटक पेट्या पळवत, आता इलेक्ट्रॉनिक यंत्रे तरी सुरक्षित आहेत का? या यंत्रात गोलमाल होऊ शकतो, असे विरोधकांचे म्हणणे आहे. हा मुद्दा उचलून धरत, उद्धव ठाकरे यांनी, बॅलट पेपरवर मतदान घेण्याचे आव्हान दिले आहे. केंद्र सरकारने आव्हान स्वीकारावे. कर नाही त्याला डर कशाला?

– **गुरुनाथ मराठे**, बोरिवली




## अंत पाहू नये

सन मराठी या वाहिनीवर, सुंदरी नावाची मालिका सुरू आहे. तिचे तारू आता भरकटले आहे. यातील सुंदरी ही साधी सरळ असते. नवरा आदित्य तिला त्रास देतो. ती कलेक्टर होवू नये, म्हणून तिच्यावर अंमली पदार्थ जवळ बाळगल्याचा आळे येऊन तुरुंगवास होतो. पण तुरुंगातून परीक्षा दिल्यावर तिचे स्वप्न पूर्ण होते. कलेक्टर झाल्यावर, अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात तिचा छळ सुरू होतो. प्रेक्षकांच्या सहनशक्तीचा इतका अंत पाहू नये.

– **गुरुनाथ मराठे**, बोरिवली





**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६७४२२७ • इ–मेल : **hitguj@marathepratishthan.org**
• वेबसाईट : **www.marathepratishthan.org**